संगीत रत्नकांता ना
टक ७ अंकी.

हें पुस्तक

सिताराम नारायण परुळेकर

यांणीं तयार केलें

तें

विठ्ठल गोविंद बाणावलीकर

वेंगुर्लेंवृत्त पत्राचे मालक

यांणीं

आपले " मालवण समाचार " छाप०

छापिलें.

सन १८८९.

किंमत टपाल खर्चासह

हें अल्पसें पुस्तक

माझी मातोश्री य[illegible]बाई शके १८०१ आ-
षाढ वद्य १४ रोजीं कैलासवासी झाली
म्हणून मातोश्रीच्या स्मारकासाठीं
हें नाटक तयार करून आमचे
कूलप्रतिपालक श्रीमंत राजे
बहादर रघुनाथराव ऊर्फ बा-
बासाहेब महाराज सरदे-
साई व राणी सीताबाई
साहेब ऊर्फ ताराबा-
बा या दंपत्यास ग्रं-
थकर्त्यानें प्रेम
पुरःसर अत्या-
दरानें हा ग्रं
थ नजर
केला
आ-
हे.

सिताराम नारायण परुळेकर
ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

श्लोक.

माझी माय जशी [illegible] दुसरी गेली असे श्रीपुरीं ॥
झालीं आजवरी तियेस वरुषें वीसार्धअर्धा पुरीं ॥
नाहीं भोगियलें तिणें सुख कधीं दुःखें अती ना मिती
आम्हां षष्ठ सुतांस हीत दुहिता ठेवोनि गेली सती ॥

या पुस्तकांत रंगभुमीवर प्रयोग दाखविणारे लोकांचे सोई-साठीं कोठें कोणत्या रीतीनें पात्रानें वागलें पाहिजे हें समजण्या-करतां योग्य ठिकाणीं कौंसांत सुचनेदाखल लिहिलें आहे. ह्या पुस्तकाची रचना करण्याचें माझ्या मनांत येऊन पुस्तकास सुरु-वात करूं लागलों आणि लागलींच अनेक प्रकारचीं विघ्नें पुढें येऊन उभीं राहिलीं. तरी त्यांतले त्यांत अडचणी सोसून हें क-ल्पित संगीत रत्नकांता नाटक तयार केलें आहे. यांतील ब-हुतेक कवितांच्या चाली रा॰रा॰ अण्णासाहेब किर्लोसकर यांच्या संगितांतील ज्या लोकांस बहुशा माहित असून म्हणण्यास सु-लभ पडतात त्याच घेतल्या आहेत, व त्यांत कांहीं वाटेल तो फेरफार केला आहे. चाली न समजल्यामुळें पुस्तक वाचणारां-स त्याचा उपयोग वाटावा तसा वाटत नाहीं व याच कारणानें कांहीं चाली पुनः पुनः घेणें भाग पडलें आहे.

हें पुस्तक करण्याचा हा माझा अगदीं पहिलाच प्रसंग असल्यामुळें त्यांत गुणापेक्षां दोषच अधिक सांपडती-ल. तरी तिकडे विद्वज्जनांनीं दुर्लक्ष्य करून गुणांचा स्विकार करावा व दोष असतील ते कळविल्यास पुढील खेपेस दुरुस्ती

करून घेण्यास ठीक पडून मी माझ्या मित्रांचा फार आभारी होईन.

वरती अण्णाच्या चाली घेतल्या आहेत म्हणून लिहिलें परंतु जरी कवितेच्या माथ्यावर अण्णाचे संगितांतील चाल घातली आहे तरी त्या कवितेंत म[illegible]प्रमाणें कांहीं फेरबदल केलेला आहे व तेणेंकरून म्हणणाऱ्यांस बरेंच सोपें पडणार आहे. हें वाचकांनीं लक्ष्यांत ठेवावें.

पुस्तक रचनेच्या वेळीं कोणाही मनुष्याचें सहाय्य कोणत्याही प्रकारें मुळींच घेतलेलें नाहीं व कोणत्या पुस्तकाचा आधार घेऊन तयार केलेलें नाहीं. फक्त जीं पुस्तकें वाचलीं व प्रयोग पाहिले त्यांतील भाषेचा उपयोग केला आहे.

हें पुस्तक अज्ञानी मनुष्यानेंही वाचिलें असतां त्यास स्पष्ट समजावें म्हणून भाषा अगदीं सोपी घालून कठीण शब्दांचा उपयोग जितका कमी करवेल तितका कमी केला आहे.

हें नाटक अथपासून इतीपर्यंत समग्र वाचिलें म्हणजे विषयी जनांला प्रीय होऊन मनुष्यानें एक निष्ठेनें परमेश्वरावर भरंवसा ठेविला असतां तो दुर्धर संकटांतून पार पडून शेवटीं दीर्घ सुखाला पोंहचतो हें स्पष्ट दिसून येणार आहे. यासाठीं मी मत्प्रीय बांधवांकडे अशी मागणी करून विनंती करितों कीं पुस्तक वाचणाऱ्यांस यांतील कवितांच्या चाली माहित नसल्यास ठाऊक असतील त्याजकडून माहिती करून घेऊन नाटक सर्व वाचावें व असें केलें तरच माझ्या श्रमाचें सार्थक्य होणार आहे.

मुकाम सावंतवाडी
ता. १५ जानुआरी
सन १८८५.

सिताराम नारायण परुळेकर
ग्रंथकर्ता.

संगीतरत्नकांतानाटक.

सूत्रधार.

(पंचतुंड नर रुंड माल धर या चालीवर.)

प्रथम नमन हें विघ्नहरासी करुनि शारदा मग नमितों ॥
सरस्वतीचे पाय नमूनी मातापित्यासी वंदितों ॥ धृ० ॥
मातृस्मरण हें भूतळिं रहावें ही इच्छा मनिं बाळगितों ॥
द्रव्यहीन मी आहें म्हणुनी इतिहासरूपें दाखवितों ॥ २
स्मारक म्हणुनी या काव्यासी रत्नकांतानाटक म्हणतों ॥
दोष न देवो पंडित म्हणुनी ईशासी कर जोडीतों ॥ प्र० ॥ ३

(हरिभजनाविण काळ या चालीवर.)

सदय प्रभो असमि कुठें नकळे हें मला ॥ धृ० ॥
सांपडसी कवण पायीं ॥ दर्शन तव कसें होई ॥
आशा माझी चरणठायीं ॥ ध्यास लागला ॥ सदय० ॥ १ ॥
शरण कसें यावें तुला ॥ सेवा तुझी घडेल याला ॥
विचार कांहिं नसुचे मला ॥ शेष खुंटला ॥ सदय० ॥ २ ॥
नेणतसें या जगातें ॥ नाना शास्त्रें नाना मतें ॥
नाना धर्म नाना वृत्तें ॥ मिति न तीर्थाला ॥ सदय० ॥ ३ ॥
विचारांतिं माझी मती ॥ गुंग होउनि गेली अती ॥
शास्त्रांसिही पडली भ्रांती ॥ नाहीं थांगला ॥ सदय० ॥ ४

नट:— मनोभावानें व निष्ठेनें परमेश्वराची स्तुति थोडीच झाली तरी पुरे आहे. (इकडे तिकडे पाहून) माझे प्रियेनें माझे मागोमाग येण्याचें ठरविलें असून ती अजून कां बरें आली नाहीं? (नटीकडे पाहून) अरे! ही माझी प्रिया इकडे जवळच असून आपणच आपल्या नादांत कांहीं बोलत आहे, तर ती काय बोलत आहे तें आपण इकडे जवळच उभे राहून ऐकावें. (एकीकडे होऊन नटीआड जाऊन राहतो.)

नटी:— परमेश्वरा, तुझी इच्छा आणीक आहे. ज्या ठिकाणीं खाण्यापिण्याचे उपद्रव, धड वस्त्र नाहीं, रहाण्यास जागा नाहीं अशा ठिकाणीं मुलें फार; आणि जगदीशा! जिकडे अन्नवस्त्र विपूल तिकडे नवस केले

तरी मूल होत नाहीं. असो. नारायणा! तुझी मर्जी. (असें म्हणू-न खिन्न वदन करून उभी रहाते. नट तिच्याजवळ जाऊन खांद्या-वर हात ठेवितो.)

नट.— प्रिये, तूं एकटीच अ[illegible]ीं काय बरें बोलत होतीस ?

नटी.— प्राणनाथ, बोलायाचें तें काय! महाराज, पुरुषांना बाहेरचीं-अनेक कामें असल्यामुळें त्यांची वेळ कशी तरी आनंदांत जाते परंतु बायकांस घरीं लेंकरूं असल्यावांचून करमणूक न झाल्यामुळें त्यां-ची वेळ सदो दित दुःखांत जाते. (गहिंवरून)

पद.

(झाली ज्याची उपवर दुहिता या चालीं.)

नाहीं ज्याला पुत्रसंतती ॥ व्यर्थ जिणें त्याचें याजगतीं ॥ धृ०
स्वर्गादिकसुख न मिळेकधींही ॥ शास्त्रांचिहि त्या ऐशिचनीती ॥१
जीण्याहुनियां मृत्यु बरा दिसे ॥ जननिंदा ते नित्यहि करिती ॥ना०॥२

देवा! लोक निंदा करून तरी स्वस्थ बसतात काय! तर नाहीं. आ-णखी असेंही मानतात.—

वदन पहाणें हें अशुभ मानुनी ॥ मुखमुरडुनियां पळतचिसुटती ॥

(डोळ्यांतून पाणी काढते.)

नट.— (नटीची पाठ थोपटून) समजलों. प्रीये, सांगतों ऐक.

साकी.

संतति संपति सुंदर जाया पूर्व सुपुण्यें पावे ॥
म्हणुनि सांगतों खचित प्रिये तुज आमुचें दुष्कृत भोवे ॥
मन हें स्वस्थ करीं हृदयीं सांठिव तो तूं हरी ॥

नटी.— पुरे झालें बाई, सर्वदा अशा ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी सांगावयाच्या. प्राणनाथ, दुधाची तृषा कोठें पाण्यानें तृप्त होत असते काय!

नट.— (हनुवटीस हात लावून) हो हो! प्रिये, बरी आठवण झाली. प-हा, आपल्या ह्या विश्वपुरी नगरींत कोणी एक अति विरक्त महाते-जस्वी जयदेव या नांवचा सन्यासी आला आहे. सबब, मी त्याज-कडे जाऊन त्यांची प्रार्थना करितों म्हणजे तो आपल्यास आशी-र्वचन देऊन पुत्र रत्न होईल असें करील. मृगलोचने, आतां तूं कां-हीं काळजी करूं नको.

नटी:— (आनंदानें) प्राणनाथ, असें जर आहे तर त्वरा करा आणि त्या सद्गुरु महाराजांकडे जाऊन त्यांची षोडशोपचारें पूजा करून त्यांचें मन संतोषवून त्यांचें आशीर्वचन घ्या.

नट:— ठीक आहे. परंतु प्रिये, मी कोणता बेत करून ह्या ठिकाणीं आलों याची या पुत्रप्राप्तीच्या बोलण्यांत विसरच पडून गेली.

नटी:— (आठवत नाहींसें करून) प्राणनाथ, आपण कोणता बेत केला होता बरें ? मला कांहीं स्मरत नाहीं बाई.

नट:— सखे, तुला स्मरत नाहीं तर सांगतों ऐक.

साकी.

पंडित जन हे सभामंडपीं प्रसन्नरूपें बसती ॥
रत्नकांतानाटक अवलोकन ही इच्छा मनिं धरिती ॥
प्रयोग करुनि बरा सुखवूं यांच्या त्या अंतरा ॥

यासाठीं लवकर पात्रांची तयारी कर.

नटी:— आज्ञा महाराज.

नट:— प्रिये, नाटकाला सुरुवात होण्यापूर्वी (कंठाजवळ हस्त नेऊन) तुझ्या मंजुळ स्वरानें परमेश्वराची गायनांत स्तुति कर.

नटी:— महाराज, कोणत्या देवतेची गायनांत स्तुति करूं ?

नट:— सखे, या कलियुगांत इच्छित हेतु पूर्ण करणारें असें दैवत कोणतें आहे सांग !

नटी:— प्राणनाथ, आपल्यास ठाऊकच असेल, सद्गुरु दत्तात्रय महाराज हेंच दैवत या युगांत जाज्वल्य आहे.

नट:— तर सखे, त्या दत्तात्रय सद्गुरूंची गायनांत स्तुति कर.

नटी:— आज्ञा महाराज.

पद.

(वैशाख मास वासंतिक समय शी भला या चालीवर.)

कलियुगांत दत्त हाचि देव राहिला ॥
संतांचें रूप धरुनि भुतविं वस्तिला ॥ धृ० ॥
दत्त दया करिति प्रापंचिकांवरी ॥
तरिच चित्त लागतसे पूर्णईश्वरीं ॥
इष्ट हेतु पूर्ण करुनि दुःख तें हरी ॥

तद्भजनावांचुनियां नमिळे मुक्तिला ॥ कलि०॥१॥
निपुत्रिकासि पुत्र दिला कीर्तिही जनीं ॥
निर्धनासि द्रव्यदान करिसि तत्क्षणीं ॥
कुष्ट आदि करुनि ... ॥
त्रीय जया एक भाव भक्ति भाळला ॥ कलि०॥२॥
पापताप पळुनि जाय दत्तचिंतनीं ॥
सिद्धांत आम्हिं ऐकतसों ईशकीर्तनीं ॥
तीच आस धरुनियां मन येत धांवुनी ॥
त्राता कोणि नाहिं आतां दिन अनाथाला ॥ कलि०॥३॥

नट :— शाबास! शाबास! प्रिये, तुझें हें मंजुळ सुस्वर गायन ऐकून हे सर्व सभाजन आपआपलें देहभान विसरून जाऊन भिंतीवरील चित्राप्रमाणें तटस्थ होऊन टकमक पहात राहिले आहेत. (पडद्यांत नारायण! नारायण! असा शब्द होतो.) (नटी व नट गमन करितात.)

प्रवेश २.

जयदेवस्वामी :— (पडद्याबाहेर येऊन वर हात करून)

पद.

जनहो श्रीपादपदीं मन ठेवा ॥ मनिं कुमति न ठेवा ॥
संगमिं संध्या स्नान करुनि श्री ॥ नरहरि चरणिं औदुंबर सेवा ॥ धृ०
त्रिगुणात्मक दत्त दिगांबर मूर्ती ॥ जे स्थिति लय करिती ॥
कवणें वर्णावी तद्गुणकीर्ती ॥ षड्गुण परिस्फूर्ती ॥ चाल ॥
चरणकमल मकरंद मधुपसम स्वामिचरण सञ्चितसुखसेवा ॥ ज०॥१
कृष्णा श्रीपूर्वक श्रीगंगा ॥ अति विमल तरंगा ॥
मध्यें श्रीसद्गुरु पदयुगिं रंगा ॥ परिहरुनि कुसंगा ॥ चाल ॥
अर्थ चतुर्विध सार्थक घडती कृतार्थ बुद्धि ठसतांचि सदैवा ॥ ज०॥२
राज्य देउनि नृप केलें रंका ॥ हा त्रिभुवनिं डंका ॥
कळतां निरसे दुरित कलंका ॥ कां मिथ्या शंका ॥ चाल ॥
धीटपणेंचि अवीट पदाप्रती नीट करुनि मन सत्वर पावा ॥ ज०॥३

नारायण! नारायण! अरेरे! काय हो या सृष्टींतील अज्ञान लोक. ज्या परमेश्वरानें आपल्यावरती अतोनात उपकार करून हा अप्रतीम नरदेह

दिला त्या परमेश्वराला तर मुळींच विसरून गेले आणि अशाश्व-
ताला शाश्वत मानून खोट्या प्रपंचालाच खरें मानितात व सारेज्ञा-
र आपला अमोलिक वेळ ईश्वरभजनावांचून निरर्थक दवडितात. फा-
र फार वाईट वाटतें! हे विश्वांतील लोक मोहपाशांत सांपडून प्रपंच
समुद्रांत गटकळ्या खात आहेत, त्यांस सदुपदेश करून ईश्वरभज-
नाची नौका दाखवावी.(असें म्हणून इकडे तिकडे फिरतात.)

(विप्रवेशी विदुषक प्रवेश करतो.)

विदु०— महाराज, हा दीन दास आपल्या चरणीं प्रणिपात करितो हा ग्रह-
ण करावा.

जय०— नारायण! अरे, तूं कोण आहेस?

विदु०— महाराज, मी आपल्या पायांचा दास, मला विदुषक असें म्हण-
तात.

जय०— अरे विदुषका, हें समोर दिसत आहे तें काय रे!

विदु०— महाराज, ही विश्वपुरी नगरी आहे. येथील राजा शौर्यसागर –
त्याचा हा वाडा.

शिष्य— गुरु महाराज, आमच्या मनांतून हा राजवाडा पहाण्याची इ-
च्छा फार आहे. आज्ञा होईल तर जाऊन येऊं.

जय०— मुलांनों, तुमची जर इच्छा आहे तर चला. मीही राजवाड्यांत
येतों. (जयदेवस्वामी व शिष्य राजवाड्यांत जातात.)

प्रवेश २.

(सुशिळाबाईचें मंदीर. शौर्यसागर खिन्नवदनें करून-
प्रवेश करितो.)

शौर्य०— (श्वास टाकून) सर्वांपुढें जावबेल परंतु प्रारब्धापुढें कोणा-
च्यानें जावबत नाहीं. पहा, मी राजा आहें, स्वतंत्र आहें, या विश्व-
पुरी नगरांत माझी सत्ता आहे, मी करीन तसें होण्यासारखें आ-
हे, सर्व विषय मला अनुकूळ आहेत; परंतु पोटीं पुत्रसंतान नाहीं
यामुळें इतकेही सुखावरती पाणी पडल्यासारखें झालें आहे. एकं-
दरींत "जगीं सर्व सुखी असा कोण आहे!" हें साधुवाक्य सर्वां-
शीं खरें आहे. असो. परमेश्वरा, तूं ठेविशील तसें रहाणें प्राणि-
मात्राला भाग आहे. (सद्गदीत होऊन)

पद.

(वस्त्रानें देह सारा सुंदरीनें झांकिला या चाली.)

असतांना द्रव्य सारें नाहींसें वाटतें ॥
सुख मजला दुःख [illegible] हृदय फाटतें ॥
प्रेम भारी स्त्रीचें आहे अप्रेम भासतें ॥
असुनीयां जीणें माझें व्यर्थचि हें दीसतें ॥ असतांना. ॥

जगदीशा! आतां आपल्या प्रारब्धावर लक्ष्य ठेवून अरण्यांत जाऊन राहिलेलें आयुष्य ईश्वरभजनांत घालवावें यावांचून मला आणखी दुसरा मार्गच राहिला नाहीं. (थांबून) माझे चित्ताला अस्थिरता फार उत्पन्न झाली आहे करितां या वेळीं प्रियेच्या मंदिराकडे तरी जावें म्हणजे मग जरा करमणूक झाली तर पाहूं. (मंदिराकडे पाहून) अहाहा! किती तरी हें माझ्या प्रियेचें मंदीर सुशोभित दिसत आहे. (डोकावून) कोणी दासी हार तुरे करण्यांत गुंतल्या आहेत, कोणी वाळ्याचें शीतळ पाणी खिडक्यांच्या पडद्यांवर शिंप्रडताहेत, कोणी अत्तरादिकरून सुवासिकद्रव्यें नम्रपणानें अर्पण करीत आहेत, कांहीं सख्या जवळ बसून मंजूळ स्वरानें भाषण करीत आहेत, याप्रमाणें आनंद चालला आहे. (पाहिलेंसें करून) ह्या स्त्रियांत सर्व नक्षत्रांत चंद्र तशी माझी ही सखी मध्यें शोभत आहे. (कानदेऊन) अहाहा! काय मौजेचा या मंदिरांतून सुस्वर हा ध्वनि येत आहे!

पद.

(येतसे मधुर ध्वनी या चालीवर.)

मंजुळ किती हा ध्वनी ॥ येत मंदिरांतुनी ॥ ध्रु. ॥
कोणी हारतुरे करिं घेउनी ॥ कोणी सुगंधि द्रव्यें भरूनी ॥
कोणी आरत्या विडे करिं घेउनि ॥ लागति स्तवनीं ॥ मंजुळ. ॥
किति बैसल्या असति गायनीं ॥ किति शीतळ पाणि करूनी ॥
किति लागती परस्पर कानीं ॥ मधुर भाषणीं ॥ मंजुळ. ॥ २ ॥
मंदिर हें शोभतसे भारी ॥ करि वैकुंठाची बरोबरी ॥
बहु हर्ष होतो अंतरीं ॥ आनंद बघुनी ॥ मंजुळ. ॥ ३ ॥

माझी प्रिया आपली सखी कमलावती हिजबरोबर कांहीं गुज गोष्टी करीत आहे म्हणून आपण आंत जाणें बरोबर नाहीं यासाठीं ये-

थेंच कोठें तरी आड रहावें.

कमला०— (सुशिला बाईस) बाईसाहेब, आपल्या मंदिरांत जिकडे तिकडे आनंद [illegible] असून आपली मुद्रा आनंदीत नसून चिंतातूर दिसते हें काय? [illegible]

सुशिला०— बाई कमलावते, तुला काय सांगू गडे! मला हे माझे मंदिरांतील शीतलोपचार आनंदवीत नसून उलटे त्रास मात्र देतात.

कम०— असें कां बाईसाहेब?

सुशि०— सखे!

पद.

(शैवाल्यें युक्त जैसें पंकज तें शोभतें या चाली.)

पुत्राविणें व्यर्थ जीणें स्त्रीयांचें संसारीं ॥
जन निंदा करुनि म्हणती जन्मोनी फुकट नारी ॥
मुख पहाणें अशुभ ऐसें म्हणताती अंतरीं ॥
म्हणुनी हें दुःख बाई जाचतसे या शरिरीं ॥ पुत्राविणें० ॥१॥

कम०— बाईसाहेब, जी गोष्ट आपल्या स्वाधीनची नाहीं, निवळ प्रारब्धाचे स्वाधीन असते तिजबद्दलचा वारंवार खेद करून सारोद्धार झुरत बसणें अगदीं उपयोगीं नाहीं.

सुशि०— गडे कमलावते तुला काय सांगूं!

(व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं या चाली.)

जन्मुनि वांझ मी झालें बाई ॥ शिणविलि मात्र ति भूमि आई ॥ धृ०
नाहिं पाहिलें पुत्रसुखातें ॥ काळिज तुटुनजाई ॥ अगसखेका० ॥ जं० ॥१
दुर्दैवचि हें पूर्वजन्मिंचें ॥ फळलें पूर्ण कायी ॥ अगसखे फळ० ॥ जं० ॥२
राज्यअसुनियांसूखनदीसे ॥ चिंताग्निहा खाई ॥ अगसखेचिं० ॥ जं० ॥३
मृत्युजरिही मजयेतातरितो ॥ आवडताचि होई ॥ अगसखे आ० ॥ जं० ॥४

कम०— बाईसाहेब, संतान होणें ही गोष्ट परमेश्वराचे स्वाधीन आहे, मनुष्याचे मुळींच स्वाधीन नाहीं; परंतु आपल्यास पुत्रप्राप्ति होईल असें मला वाटतें.

सुशि०— सखे, तूं कशावरून म्हणतेस?

कम०— कशाहीवरून का होईना! माझ्या बोलण्यावर आपण विश्वास द्या म्हणजे समजेल.

सुशि०— गडे, तुझ्या तोंडांत पसाभर साखर पडो. पहा, जर मला पुत्रप्राप्ति झाली तर देवीची नवचंडी करीन, शिवालयांत रुद्राभिषेक ठेवीन, विष्णु आलयांत नंदादीप करीन, ब्राम्हणसमाराधना घालीन, लक्षजप करवीन, परंतु एक वेळ ... आस होऊंदे.

कम०— बाईसाहेब, असाच आपण परमेश्वरावर भरिभार ठेवा म्हणजे तो परमेश्वर तुमची चिंता कधींही ठेवणार नाहीं. मला आतां फार रात्र झाली यासाठीं आज्ञा मागतें.

सुशि०— सखे, तूं आलीस म्हणजे मला कांहीं बरें वाटतें, परंतु तूं जाऊं लागलीस म्हणजे फार वाईट वाटतें. माझ्यानें तर तुला जा मुळींच म्हणवत नाहीं, परंतु तूं परतंत्र असल्यामुळें तुझा इलाज नाहीं. असो. याउपर कधीं दर्शन घडणार?

कम०— बाईसाहेब, मी जरी घरीं असलें तरी माझें तनमन या पायांकडेसच असतें.

सुशि०— सखे, हें काय मला समजत नाहीं? पण असाच सदैव लोभ टिकूं दे म्हणजे झालें. (इतकें झाल्यावर कमलावती सुशिलाबाईस नमस्कार करून जाते.) (दासीस) अग, माझें आज डोकें दुखत आहे यासाठीं सर्वत्रांस जाण्यास निरोप दे व ही शाल माझे आंगावर घाल आणि तूंही जाऊन नीज.

दासी०— आज्ञा बाईसाहेब. (इतर जनांस सांगते.) बायांनों, आज बाईसाहेबांची तबियत जरा नादुरुस्त आहे यासाठीं तुम्ही आपापलीं कामें आतांच बंद करून विश्रांती घेण्यासाठीं आपापल्या घरीं चला. (सर्व जणी दासीशिवाय करून जातात.)

शौर्य०— काय! माझ्या प्रियेचें आज डोकें दुखत आहे! डोकें दुखण्याचें कारण काय बरें असावें? (थांबून) समजलों. आतां प्रिया मंदिरांत एकटी आहे, ह्यावेळीं मंदिरांत जावें. (मंदिरांत प्रवेश करून) (दासीस) काय ग, आज स्वारीला लवकरशी झोंप लागली? रात्रीं जागरण बिगरण झालें होतें कीं काय?

दासी०— सरकार, आतांशा यांच्या मागें जी सवत लागली आहे तिचे त्रासामुळें दररोज जागरणेंच होत आहेत.

शौर्य०— आं! काय म्हणतेस? हिच्यामागें सवत लागली आहे ती कोणती?

दासीः— महाराज, आपल्यास माहितच असेल. दुसरी कोण सवत असायाची? चिंता. हल्लीं यांच्यामागें जी काळजी लागली आहे तिणें तर यांची पुरेच पुरविली आहे.

शौर्य.— (आपणाशीं) असली हिला काळजी असावी बरें? माझ्या मतें हिला काळजी असण्याचें कांहीं कारण नाहीं. (मनांत) ज्या गोष्टीची मी सारीखार काळजी करीत आहें त्याचेचबद्दल हिला काळजी असावयाची. खरेंच आहे, "गृहरत्नानिबालकः" असें जें साधुवाक्य आहे तें कांहीं खोटें नव्हे, आणि पुत्रावांचून पितरांनासुद्धां मुक्ति नाहीं. म्हणून माझे पितरही मला संतति नसल्यामुळें फार दुःखी असतील. अरेरे!

पद.

(शिणलासि बहुविध वेश धरुनि.या चाली.)

पितरांसी मम मुक्तिहि नाहीं पुत्रावीणें हरी ॥
खिन्न वदनें ते असतील बसले स्वर्गभुवनांतरीं ॥ धृ० ॥
वेदगृहित श्राद्धांची इच्छा धरितिल हृदयांतरीं ॥
तिलांजुली त्यांसी पश्चात माझ्या देणार कोण तरी ॥
नरकयातना भोगणें लागे जन्मजन्मांतरीं ॥
समयाची त्या आठवण होतां हृद्गत जाळ करी ॥

असो. परमेश्वरा, तुझे इच्छेनुरूप सर्व गोष्टी घडत असतात. आतां प्रियेस जागृत करावें. (दासीस) किती वेळ झाली झोंप लागून?

दासीः— बरीच वेळ झाली महाराज.

शौर्य.— तर मग उठविण्यास आतां कांहीं हरकत दिसत नाहीं. उठीव पाहूं.

दासीः— (सुशिला बाईस दळवून) बाई साहेब, बाई साहेब,

सुशि.— काय ग जळ्ळा तुझा त्रास हा!

दासीः— बाई साहेब, (असें म्हणून राजाकडे बोट दाखविते.)

सुशि.— (पलंगावरून उठून एकीकडे उभी रहाते.)

शौर्य.— काय आज स्वारीची आनंदीत मुद्रा दिसते?

सुशि.— आनंदीत काय आणि दुःखित काय! स्त्रियांचे सर्व आनंद पतीवरते अवलंबून असतात.

शौर्य.— मला वाटतें आज तुझ्या मंदिरांत येतांना वाटेंत उत्तम शकून

झाले त्याचें हेंच फळ असावें.

सुशि० प्राणनाथ, मी आतां निजलें तेव्हां मला एक सुंदर स्वप्न पडलें.

शौर्य० प्रिये, सांग सांग पण तुला कोणतें स्वप्न पडलें तें?

सुशि० प्राणनाथ, आतांच माझी दासी कमलावती माझे मंदिरांतून गेली. ती गेल्यावर माझें जरा डोकें दुखूं लागलें म्हणून मी या पलंगावर निजलें.

शौर्य० बरें मग?

सुशि० मी निजल्यावर मला कांहीं झोंप लागली आणि लागलेंच स्वप्नास आरंभ झाला.

शौर्य० तुला काय बरें स्वप्न पडलें?

सुशि० प्राणनाथ, स्वप्न असें पडलें. कोणी एक भव्य सन्यासी आला, त्याचे बरोबर दोघे शिष्य असून त्याचे पायांत सुंदर खडावा होत्या, हातांत दंडकमंडलू धरिलेला होता; त्याचें तेज कोटी सूर्यान्च्या तेजासारखें दिसत होतें. असा तो सत्पुरुष माझ्यासमोर येऊन उभा राहिला. त्याचें तें अत्युत्तम ध्यान पाहून मला फारच आनंद झाला. नंतर मी त्या यति महाराजांस नमस्कार घातला.

शौर्य० प्रिये, स्वप्न तर उत्तम आहे. बरें मग पुढें?

सुशि० नंतर मी व आपण अशीं उभयतां मिळून त्यांची षोडशोपचारें पूजा केली, तेव्हां स्वामिमहाराज संतुष्ट होऊन तुमचें इच्छित पूर्ण होईल असें म्हणाले. इतक्यांत दासीनें मला उठविलें.

शौर्य० प्रिये, तूं जो प्रकार सांगितलास यावरून स्वप्न फारच चांगलें आहे.

सुशि० प्राणनाथ, यति महाराजांची ती दिव्य मूर्ति अद्यापि माझ्या डोळ्यांसमोरच आहे कीं काय असें मला दिसतें. कसेंही होवो, परमेश्वरानें आमचें एवढें गाऱ्हाणें ऐकून निपुत्रिकपणाचा कलंक धुऊन टाकिला म्हणजे झालें.

शौर्य० सखे, आतां खचित खचित आपल्याला पुत्रप्राप्ति होईल.

(राजदूत प्रवेश करितो.)

दूत० (दासीस) महाराज सरकारास असें कळीव कीं, राजवाड्यासमोर कोणी सन्यासी येऊन उभा राहिला आहे. त्याचें तेज दशदिशा

फांकून गेलें आहे, त्याचेबरोबर दोघे शिष्य आहेत, मुखानें नारायणनामाचा घोष चालला आहे. हें वर्तमान सरकारच्या कानावर घालण्यासाठीं [illegible]धाजींनीं मला पाठविला आहे.

दासी:— (शौर्य[illegible]रास) महाराज [illegible]धानजींकडून दूत आला आहे.

शौर्य.— कशासाठीं आलो आहे [illegible]चारून ये.

दासी:— सरकार, तें मी पूर्वीच विचारिलें. कोणी दैदिप्यमान सन्यासी दोघां शिष्यांसह राजवाड्यासमोर उभा आहे. हें वर्तमान कळविण्यासाठीं प्रधानजींनीं त्यास पाठविलेला आहे.

शौर्य.— (आनंदीत होऊन) दुतास सांग कीं, प्रधानजीस स्वामीचे चरणपुजेसाठीं पुजेचें सर्व साहित्य तयार ठेवण्यास सांगितलें आहे म्हणून.

दासी:— बरें आहे. (म्हणून निघून जाते.)

शौर्य.— प्रिये, ऐकिलेंस काय! दासीनें काय सांगितलें तें.

सुशि.— प्राणनाथ, ईश्वरकरणी किती विचित्र आहे त्याचा तर्कसुद्धां करवत नाहीं. देवा, तुझे आमच्यावरती अनंत उपकार आहेत.

शौर्य.— प्राणसखे, स्वप्नांत उभयतांनीं स्वामी महाराजांची पूजा केल्याचें सांगितलेंस; परंतु आतां प्रत्यक्ष पूजा करण्यासाठीं माझ्याबरोबर आलें पाहिजे.

सुशि.— प्राणनाथ, मी तर तयारच आहें, आपल्या कडूनच वेळ.

प्रवेश ३ समाप्त.

प्रवेश ४.

(राजवाड्यासमोरील चौक.)

जयदेवस्वामी दोघां शिष्यांसमवेत प्रवेश करितात.

जय.— काय अद्भुत चमत्कार या भूतलावर दृष्टिगोचर होत आहेत! जिकडे पहावें तिकडे विषयी जन विषयीसुखाचे कृत्यांत कसे गुंग होऊन जन्मदात्या परमेश्वराचे बेउपकारी होऊन गेले आहेत!

पद.

(गड्यांनो घ्या हरीच्या नामा या चाली.)

प्रभुचें नाम मुखीं घ्यावें॥ सर्वदा हृदयीं सांठवावें॥ धृ.॥

सांगतों तुम्हां खचित आतां ॥ हरिल तो तुमचि सर्व चिंता ॥
धरूं नका संशयाची वार्ता ॥ टांका प्रपंचाचि ममता ॥
सर्वांमुखीं सदय पहावें ॥ प्रभुचें ०॥१॥
नरांचा देह अमुल आहे ॥ [illegible] हा प्राप्त कदा नोहे ॥
भागवतिं धर्म हाचि पाहें ॥ गीतांहि कृष्ण सांगताहे ॥
सारासार निवडावें ॥ प्रभुचें ०॥२॥

(शौर्यसागर, सुशिलाबाई, प्रधान व सेवक प्रवेश करितात.)

शौर्य० (स्वामीस) महाराज, हा आपला दास चरणीं प्रणिपात करित आहे.

जय० नारायण! नारायण! अरे, तुम्ही कोण आहां?

शौर्य० महाराज, मी आपल्या चरणाचा दास आणि या विश्वपुरी नगराचा प्रतिपालक, मला शौर्यसागर असें म्हणतात. (सुशिलाबाईकडे बोट दाखवून) ही आपली दासी व माझी स्त्री, (प्रधानाकडे बोट दाखवून) हा आपला दास व माझा प्रधान आहे. महाराज, आपले चरण माझ्या वाड्यास लागावे अशी इच्छा धरून वाड्यांत येण्याविषयीं विनंती करितों.

जय० राजा, आम्ही मुमुक्षुजन, आम्हांस तुझा वाडा सारखा आणि अरण्य सारखें आहे.

शौर्य० स्वामी महाराज, तें खरें आहे परंतु आम्हां प्रापंचिकांचे हेतु आपल्यावांचून कोण पूर्ण करणार?

जय० राजा, जर तुझा हेतु आहे तर चल वाड्यांत. (सर्वत्र राजवाड्यांत जातात. राजानें जयदेव स्वामीस नेऊन सिंहासनावर बसविलें.)

शौर्य० (प्रधानास) स्वामीची चरणपूजा करण्यासाठीं पुजचें सर्वसाहित्य आणवावें. (पुजेचें सर्व सामान घेऊन येतो व राजा स्त्रीसह स्वामीची पूजा करितो.) (जयदेव स्वामीस) महाराज, मी आपली चरणपूजा करीत आहें ती ग्रहण करावी.

जय० राजा, तुझा प्रेमा पाहून मी संतुष्ट झालों.

शौर्य० महाराज, आपल्या चरणदर्शनानें मी पुनीत झालों, ही माझी सर्व नगरी पवित्र झाली. आतां मला अचिंत करणार हे पाय समर्थ आहेत.

जय॰_ राजा, तूं आपल्या बोलण्यांत आपल्यास चिंता असल्याचें दर्शविलेंस तर तुला कोणती चिंता आहे ती सांग?

शौर्य॰_ महाराज आपल्या चरणकृपेंकरून सर्व सुखें अनुकूल आहेत, परंतु पोटीं संतान नसल्यामुळें त्याहीवर सुखावरती पाणी पडल्या सारखें झालें आहे.

साकी.

संततिवीणें सुखें सर्व तीं दुःखें ऐशीं दिसती ॥
जनोपवादा साहवत नाहीं निपुत्रिक ऐसें म्हणती ॥
कलंक हा धुउनी ठावही द्यावाया चरणीं ॥ १॥

जय॰_ राजा, सांगतों ऐक.

साकी.

ईशअवकृपें भूपति तूझ्या राज्यावरती विघ्न ॥
होउनि होइल दुःख प्रजांसी होतिल जन ते खिन्न ॥
येउनि तुजजवळी चरण घेतिल तव भाळीं ॥

शौर्य॰_ (श्वास टांकून व खिन्न वदन करून) महाराज, सर्व दुःखांतून पार पाडणार आपणच आहां.

जय॰_ राजा, हें ऐकून तुला वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

शौर्य॰_ स्वामी महाराज, आपलें दर्शन झालें असल्यामुळें माझीं दुःखें दिगांतीं गेलीं.

जय॰_ पुढें सांगतों ऐक.

साकी.

व्याघ्र उपद्रव होउनि भारी भक्षिति पोरें बाळें ॥
मग तूं जाउनि विपिनीं राजा मारिशि व्याघ्रपाळें ॥
हरुनी जनदुःखा घेशिल विश्रांतीच्या सुखा ॥

शौर्य॰_ आपलेच चरण समर्थ आहेत.

जय॰_ राजा, त्या अरण्यांत तुला पुत्रप्राप्ति होईल. आतां आमची स्नान संध्येची वेळ होत आली करितां आम्ही गमन करितों.

शौर्य॰_ आमची इच्छा कांहीं दिवस मुकाम या वाड्यांत व्हावा अशी होती.

जय॰_ राजा, आम्ही जर इकडे राहिलों तर आमचीं नैमित्तिक कर्में

चालणार नाहींत यासाठीं आम्हांस अरण्यांतच वास्तव्य केलें पाहि-
जे.

शौर्य॰ आपली इच्छा.

(जयदेवस्वामी [illegible] गमन करितात.)

शौर्य॰ काय तेज त्या स्वामी महाराजांचें! स्वरूप पाहिल्यापासून ती म-
नोहर दिव्य मूर्ति डोळ्यांसमोर उभीच आहे असें वाटतें.

प्रधा॰ बोलणें किती मधुर, ज्यांस राजा व रंक सारखेच, अशा सत्पुरु-
षांचें दर्शनसुद्धां महादुर्लभ.

सुशि॰ प्राणनाथ, मला तर त्या स्वामी महाराजांचे चरण सोडूंच नयेत-
असें वाटलें. जर त्या स्वामी महाराजांनीं आम्हांवर कृपा करून को-
हीं दिवस वाड्यांत मुकाम केलें असतें तर बरें होतें.

पुरोहित॰ राजा, ते सिद्ध पुरुष, मनेच्छेप्रमाणें हिंडत रहाणारे. पा-
हिलेंस ना त्यांचें बोलणें कसें व किती निस्पृहतेचें तें! अरे, तो सिं-
हासनावरून एकदम उठून चालता झाला.

प्रधा॰ आतां त्या यति महाराजांची स्वारी कोठें गेली असेल बरें! (इ-
तक्यांत दूत येतो व स्वामी महाराज वाड्याबाहेर नाहींसे झाले असें
कळवितो.)

पुरो॰ राजा, तुझें भाग्य थोर म्हणून तुला त्या सद्गुरूचें दर्शन झालें.

प्रधा॰ सरकार, सूर्य माध्यान्हीं आला, आपल्यास भोजनास उशीर होईल.

पुरो॰ राजा, चल आतां तूं सर्व काळजी सोड. तुला खचित पुत्रप्राप्ति होईल.

शौर्य॰ चला, हा आपल्याच पुण्याईचा प्रताप असें मी समजतों.

(सर्वत्र जातात व पडदा पडतो.)

अंक पहिला समाप्त.

अंक २रा.

प्रवेश १ ला.

रत्नपूर राजाचा राजवाडा.

(मुहास्यराज रत्नपूरचा राजा त्याची थोरली बायको मदनमंजरी व तिची सखी चंपावती हीं प्रवेश करितात.)

मदन०— (दासीस) दाराजवळ रहा आणि जर कोणी येऊं लागलें तर मला प्रथम सूचना दे.

दासी:— आज्ञा बाईसाहेब.

मदन०— (चंपावतीस) सखे, अग अशी दूर कां बसतेस? अलिकडे ये. बरोबरच आहे, बाई, प्रारब्धानेंच मला सर्वांशीं दूर केलें आहे मग तूं तरी जवळ कशी बसशील?

चंपा०— बाईसाहेब;

अंजनीगीत.

आत्मा असतो शरिराजवळी ॥ वृक्ष जगती मूळामूळीं ॥
बाळक नसतां माय तळमळी ॥ ठाउक हें तुम्हा ॥१॥
प्रकाश वस्ती दीपापाशीं ॥ सरिता जैशी महानदासी ॥
तैशिच मी हो तुम्हापाशीं ॥ असतां दूषण हें ॥२॥

बाईसाहेब, मी सदैव आपल्यासन्निध असतांना मला हा शब्द तेव्हां हें माझेंच दुर्दैव समजलें पाहिजे.

मदन०— सखे, तसें नाहीं, मी हें स्वाभाविकत्व म्हटलें. याजबद्दल तूं आपल्या मनांत वाईट वाटूं देऊं नको.

चंपा०— तें असो पण बाईसाहेब, हल्लीं दिवसेंदिवस तुमची प्रकृति क्षीण झाल्याचें दिसतें याचें कारण काय? आपल्यास सर्व सुखें अनुकूल आहेत, कोणत्याच गोष्टीची कमतरता नाहीं, महाराजांचा प्राण तर आपण, असें असतां मुद्रा नेहमीं चिंतातूर दिसते हें कसें?

मदन०— काय सांगूं सखे! माझ्यासारखी दुर्दैवी स्त्री या जगांत दुसरी कोणी नसेल.

पद.

(प्रियकर माझे भ्रातेहि मजवर निष्ठुरता धरिती या चालीवर.)

मम सवत ती रतिप्रिया गे गर्भश्रंत जहाली ॥ सखये ॥
जन चदतीही मानिति तीची मी झालें खाली ॥सखये॥धृ०
प्राणपतीही मानिति निज जशी हृदयाची साउली ॥सखये॥
प्रीतिहि मजवर परवर [illegible] दुःखाशी ओली ॥ सखये ॥२॥
अपमान मजला साहवत नाही जिव हा बहु तळमळी ॥सखये॥
ही तव सखीगे दीन होऊनी मानसिं बहु भ्याली ॥सखये॥ ३॥
काळिज माझें जळुनी लाही आंगाचिग झाली ॥ सखये ॥
खचित खचित शेवटिंची ही भेट तुझी घडली॥सखये॥४॥
(चंपावतीच्या गळ्यास मिठी मारून रडूं लागते.)

चंपा०— बाईसाहेब, जरी हें आपल्यास दुःख झालें आहे तरी तें पर्याया-नें कमी केलें पाहिजे. त्याविषयीं सारेखार हुरहुर बाळगणें उपयोगीं नाहीं.

मदन०— सखे काय करूं! हें माझें दुःख हरणार्थ शरण तरी कोणाला-जाऊं!

अंजनीगीत.

त्राता तोची मारूं लागला ॥ सांडी गाई निज वत्साला ॥
भर्ता न मानी जरी कांतेला ॥ नाहीं मार्ग तिथें ॥ १॥

तर सखे, परमेश्वराचेच मनांत मला दुःख द्यावयाचें असलें तर इलाज-च नाही. (थांबून) सखे, मनांत जर हितगूज असलें तर कोणा-स सांगावें बरें.

चंपा०— बाईसाहेब, आपल्या प्रीय मैत्रिणीसच सांगवें.

मदन०— सखे, माझी जिवलग मैत्रीण तूंच आहेस. तुझ्यावांचून मला-आपाखी विश्वासाची दुसरी कोणी मैत्रीण नाहीं.

चंपा० आपण मानली तर आहे.

मदन०— तर सखे, मला या दुःखांतून पार होण्यास एक उपाय सुचला आहे तो तुझ्या कानावरती घालून मग तुझे मतानें तें काम करा-वें अगर न करावें हें ठरवावें असें आहे; परंतु ती गोष्ट ओठाबाहे-र गेली असतां तुझा व माझा गळा जाईल.

चंपा०— बाईसाहेब, माझेकडून गोष्ट बाहेर फुटेल असें आपणास वा-टतें काय?

मदन.— तसें नाहीं; परंतु सांगितलें. पहा, माझें दुःखाचें मुळ कोठें आहे!

चंपा.— रतिप्रिया बाईसाहेबांकडे.

मदन.— (तोंड मुरडून) जळल्या मेल्या बाईसाहेब. माझे मनांत असें आहे, त्या रतिप्रियेचाच घात करून टांकावा.

चंपा.— बाईसाहेब, माझे मनांत ही गोष्ट पूर्वीच येऊन चुकली होती; परंतु अशा प्रकारची गोष्ट बोलण्यास छाती होत नाहीं पण:—

दिंडी.

कैशा रीतीनें कृत्य करावें हें ॥
म्हणुनि चिंता ही दीर्घ वाटताहे ॥
कर्म मोठें कठिण अती घोर ॥
घडुन येण्यासी कोणता विचार ॥

मदन.— कार्य कसें करावें याचाही विचार मी पूर्वीच केला आहे. कांहीं दिवसांनीं त्या रतिप्रियेचें डाहळे जेवण होईल, त्या दिवशीं ती कुळाचे रीतीप्रमाणें या नगरापासून एक कोशावर केसरी-डोंगरांत जी कालिका देवी आहे तिच्या पुजेस जाईल; तेथें मारेकऱ्यांकडून हें काम करवावें.

चंपा.— बाईसाहेब, ही युक्ति फार चांगली आहे.

(रतिप्रिया व तिची सखी मालती प्रवेश करितात.)

रति.— सखे मालते, आपण जरी आकाबाईचे भेटीस जात आहों तरी माझ्या बाई छातींत धडधडत आहे.

मालती.— बाईसाहेब, असें होण्याचें कारण काय?

रतिप्रि.— हें बघ, तिच्यासारखी दुष्ट बायको या जगांत दुसरी कोणी नसेल. मला कांहीं दिवस गेल्यामुळें तिला मस्तकीं पर्वत-पडल्यासारखें झालें आहे.

मालती.— बाईसाहेब, ती कितीही जरी दुष्ट असली तरी तुम्हाला-तिच्याशीं काय करायाचें आहे?

रति.— सखे, माझें बरें तिच्यानें बिलकूल पहावत नसल्यामुळें ती कोणत्या वेळीं काय करील याचा नेम नाहीं.

मालती.— आपण सावधगिरीनें रहावें म्हणजे झालें.

रतिप्रि०— सखे, मी सर्वभार परमेश्वरावर टेविलेला आहे.

(मदनमंजरीच्या मंदिराजवळ येतात.)

दासी:— (मदनमंजरीस) धाकट्या बाईसाहेबांची स्वारी येत आहे सरकार. (सर्वत्र आपापली बोलणीं आटोपतात.)

मदन०— (दासीस) तिला आंत बोलाव.

(रतिप्रिया व मालती मंदिरांत येतात.)

रतिप्रि०— (आपणांत) आतां या आमच्या आकाबाई साहेब काय वाग्बाण सोडतील त्या सोडोत.

(रतिप्रिया व मालती मदनमंजरीस नमस्कार करून बसतात.)

मदन०— (रतिप्रियेस) कसं काय, बरें आहे ना! आज इकडे येण्यास बरीच सवड मिळाली, व तिकडून कशी मोकळीक दिली असेल ती असो. खरेंच आहे बाई, आतां तूं कशाला येशील!

रतिप्रि०— असं कसं होईल!

पद.

(अरसिक किती हा सेला या चालीः)

मन माझें या चरणीं ॥ गुंतुनि राहे प्रिय साजणी ॥
असतां या सुंदर वदनीं ॥ कां भाषणें हीं मज खोंचूनी ॥
जोडुनी नमितें मी पाणी ॥ लोभ करावा दिन जाणूनी ॥
अंकित तुमची असूनी ॥ कां करितां या ऐशा करणी ॥
शिर हें मी पायीं अर्पुनी ॥ येत असें हो लोटांगणीं ॥
माना ही पाठिची भगिनी ॥ तुम्हिच मजला प्रीतीची जननी ॥ मन माझें. ॥

मदन०— (आपणांतच) माझ्या मनांत हिच्याविषयीं द्वेषभाव असल्याचें जर हिला कदाचित् समजलें तर आपल्या पुढील कृत्यास विक्षेप येईल, यासाठीं हिला माझी पूर्णप्रीति असल्याचेंच दर्शविलें पाहिजे. (प्रफुल्लित मुद्रेनें)

पद.

(आता तूंचि हरी या चालीवर.)

प्रीतिहि तुजवरती ॥ रतिप्रिये प्रीतिहि तुजवरती ॥ ध्रु० ॥

प्राणाहुनिही विशेष आहे ॥ जाण तूं हें चित्तीं ॥ रति०॥१॥
नसतां जवळी क्षणभरी तूंगे ॥ होतें दुःख अती ॥ रति०॥२॥
तुजविण वाटे युगसम घटिका ॥ नाहीं भेदरीती ॥ रति०॥३॥
विनोद म्हणुनी बोलिलें तुजमी ॥ करूं नको खंती ॥ रति०॥४

रतिप्रि०— आकाबाई, मला आपण माझे आईबापांचे जागीं आहां. माझें बरें वाईट करणें आपल्याचकडे आहे.

मदन०— तें असो. पण आतां तुला सातवा महिना लागत आला, तुझें डोहळेजेवण केलें पाहिजे.

रतिप्रि०— माझें सर्व हव्यतव्य करणें तुमचेच स्वाधीन आहे. आकाबाई, मला रात्र फार झाली आतां निरोप द्यावा. (रतिप्रिया व मालती जाते.)

मदन०— (दासीस) अग, भीमराव रामोशांचा जमादार तुला ठाऊक आहे ना?

दासी:— होय बाईसाहेब, मला भीमराव माहित आहे.

मदन०— त्याचे घरीं जा आणि त्यास आतांचे आतां आहेस तसाच बलावला आहे म्हणून सांग.

दासी:— बरें आहे. (असें म्हणून पडद्यांत जाऊन भीमरावास घेऊन येते. व भीमराव मदनमंजरीस नमस्कार करून उभा रहातो)

मदन०— (दासीस) भीमरावास बसण्यासाठीं आसन दे.

भीमराव:— बाईसाहेब, या बंद्याची आठवण होऊन बलावणें कां झालें!

मदन०— मी तुम्हास माझे खुद्द कांहीं नाजुक कामासाठीं बलाविलें होतें. माझें दुःख तुमचेवांचून दूर होणार नाहीं.

भीमराव:— बाईसाहेब, असें आपणास कोणतें संकट पडलें आहे तें या दासास सांगावें. जर माझे हातून निवारण होण्यासारखें असेल तर करण्यास मी हात जोडून तयार आहें.

मदन०— काय सांगूं भीमराव! मला जर या वेळीं मरण येईल तर पुरवलें परंतु हें जीणें नकोसें झालें आहे! (किंचित् डोळ्यांतून पाणी काढते.)

भीमराव:— बाईसाहेब, आपलें दुःख मला कथन कराल तर तें दू-

र करण्यासाठीं माझा प्राण खर्च करून तुम्हास सुखी करीन, यास अंतर करणार नाहीं.

मदन.— आपण हें काम करीन अशाबद्दल वचन द्या, नाहीं तर ही तरवार घेऊन (तरवार देते.) माझा शिरच्छेद करा.

भीमराव.— बाईसाहेब, असें अभद्रभाषण आपण कधींही करूं नये. वचन कशास पाहिजे! मी बोलतों हेंच वचन समजा म्हणजे झालें.

मदन.— माझी जर समजूत होत आहे तर वचन देण्यास काय हरकत आहे!

भीमराव.— आपली जर इच्छाच असेल तर वचन देण्यास मी तयार आहें.

मदन.— (आनंदानें दासीस) अग, त्या पेल्यांतून तांदूळ घेऊन ये. (दासी रत्नजडित पेल्यांतून तांदूळ व पुष्पें घेऊन येते.)

भीमराव.— हें घ्या वचन. (असें म्हणून पेल्यांतून तांदूळ व पुष्पें काढून मदनमंजरीच्या हातांत देतो.)

मदन.— भीमराव, सांगतें ऐका.

पद.

(वाडवडीलां सेवीत जावें या चालीवर.)

गर्भवंत झाली रतिप्रियाराणी॥ हें दुःख टोंचे ममांतःकरणीं॥ ध्रु०
अपमान होतो ह्या क्षणोक्षणीं॥ साहवत नाहीं मजलागोनी॥१॥
झडकरि तीचा घातकरोनी॥ सोडिव मजला या चिंतेतूनी॥२॥
शंका ही आतां मनिं नाणोनी॥ लागा तुम्हिया झडकर करणीं॥ग०॥३

भीम.— (सुस्कारा टाकून) बाईसाहेब, असें काम माझे हातून आपण करवूं नये व मी करणार नाहीं. यापेक्षां या तरवारीनें आपणच माझा शिरच्छेद करावा. कारण धाकट्या बाईसाहेब गरोदर असल्यामुळें आज या सर्व नगरांतील लोक आनंदीत आहेत. त्यांस पुत्ररत्न होईल या आशेनें शिवालयांत जिकडे तिकडे रुद्राभिषेक चालले आहेत, विष्णु मंदिरांत नंदादीप लावले आहेत. अशांत मी त्यांचा घात कधींही करणार नाहीं.

मदन.— (रागानें) भीमराव, विचार कर, कार्य करीन अशाबद्दल

तूं पूर्वीच वचन देऊन चुकला आहेस.

भीमराव:— (थांबून आपल्यांत) माझें वचन तर गेलें खरें, स्त्रियांचे बुद्धीस लागून हा अतिप्रलय होण्याचा प्रसंग आला आहे. असो. (मदनमंजरीस) बाईसाहेब, हें दुर्घट काम करावें तरी कसें!

मदन.— कार्य कसें करावें याबद्दल आपण मुळींच काळजी बाळगूं नये. तुमच्या केंसासही धक्का न लागतां कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल अशी तजवीज मी पूर्वींचि योजून ठेविली आहे.

भीमराव:— ती कोणती बाईसाहेब!

मदन.— आजपासून चवथे दिवशीं रतिप्रियेचें डोहळेजेवण होईल, त्या दिवशीं कुळाचे रीतीप्रमाणें ती केसरी डोंगरांतील कालिका देवीच्या पुजनास जाईल त्या देवालयांत आदले दिवशीं तुम्ही बैराग्याचे वेशानें आंत असावें, व हीं वाघनखें हातांत घालावीं, (असें म्हणून वाघनखें देते.) आणि ती पुजेस आंत आली म्हणजे वाघनखें तिचे पोटांत खुपसून तिचा घात करावा व लागलेंच बैराग्याचे वेशानें तुम्ही परत यावें.

भीमराव:— तें सर्व होईल परंतु त्या रतिप्रियेबरोबर आणखी पुष्कळ मंडळी येईल त्यांत हें काम करितां येणार नाहीं.

मदन.— सर्व लोक बाहेर राहून एकटी रतिप्रिया देवालयांत जाईल. तेथें तिचा घात करावा म्हणजे झालें.

भीमराव:— बरें आहे बाईसाहेब. पण हें काम झाल्यावर मला बक्षिस.

मदन.— भीमराव, हें कार्य झालें तर तुझ्या वंशाचें दारिद्र फेडून टाकीन. (गळ्यांतील चंद्रहार काढून भीमरावास देते.)

(भीमराव मदनमंजरीचा निरोप घेऊन निघून जातो.)

मदन.— (आनंदानें दासीस) आपलें निंमे काम झालें.

दासी:— खरेंच बाईसाहेब. निंमे कां! सगळेंच झालें म्हटलें तरी चालेल.

मदन.— आतां मला झोंप येते, मी निजतें. माझे आंगावर ही शालू घालून मला झोंप लागल्यावर तूंही नीज.

प्रवेश २.

रतिप्रियेचा महाल.

(रतिप्रिया व तिची सखी मालती व दासी प्रवेश करितात.)

मालती.— बाईसाहेब, तुम्ही गर्भवंत असल्यामुळें आपल्या ह्या नगरांत जिकडे तिकडे आनंद चालला आहे, असें असून आपण नेहमीं चिंतातूर असतां हें काय!

रतिप्रि.— सखे काय सांगू!

पद.

(जाते कीं मम शकुंतला. या चालीवर.)

माझे मनिंचें इंगित सारें ठाउक ईशाला ॥
त्याविण सखये तारक मजला कोणी नच उरला ॥ ध्रु.॥१
मदनमंजरी सवत सदोदित करिते द्वेषाला ॥
गर्भवंत मी झालें म्हणुनी मत्सर मनिं धरिला ॥ २॥
मम प्राणाची आशा तिळही नाहिंच गे मजला ॥
परि गर्भाचा लोभ सखे गे चित्तीं दृढ बसला ॥ ३॥ माझे.॥

मालती.— बाई साहेब, थोरल्या बाईसाहेबांनीं जरी आपला द्वेष केला तरी त्या तुमचा असा नाश करणार नाहींत. तुम्ही भलत्याच प्रकारचा संशय मनांत धरून सारोद्धार झुरत बसूं नये, हें माझें तुम्हास सांगणें आहे. आज जर प्रकृति क्षीण झाली तर पुढें कसें होईल!

रतिप्रि.— सखे, तूं कांहीं म्हण परंतु मला बाई त्या दिवसाच्या बोलण्यापासून तिचा मोठा धाक बसून गेला आहे. ती कोणत्या वेळीं काय करील याचा नेम लागत नाहीं.

(पुरोहित प्रवेश करितो.)

पुरोहि.— (आपणांत) राजानें अशी आज्ञा केली आहे कीं, रतिप्रियेस कुलाचार रीतीप्रमाणें त्या केशरी डोंगरांतील देवीचे पुजेस न्यावें. (थांबून) आमच्याकडील तर सर्व तयारी झालीच, व पुजेस जाण्याचा समयही होत चालला तेव्हां रतिप्रियेच्या महालाकडे जावें. (असें म्हणून महालाकडे जाण्यास जातो.)

मालती:— बाईसाहेब, आजच आपल्यास देवीचे पुजेस जाणें आ-
हे, यासाठीं मनांतील दुःख टाकून आनंद मानावा.

पुरोहि०— (महालांत प्रवेश करून दासीस) अग, रतिप्रियेस मी-
आलों आहें म्हणून सांग.

दासी:— (रतिप्रियेस) सरकार, गुरुजींची स्वारी आली आहे.

रतिप्रि०— त्यांला लवकर आंत बोलाव.

(दासी पुरोहितासह महालांत येते.)

रतिप्रि०— गुरुजी, ही रतिप्रिया आपणास नमस्कार करिते हा ग्र-
हण करावा.

पुरोहि०— अष्टपुत्री भव. रतिप्रिये, तुला खचित पुत्ररत्न होईल व
तो पुत्र महा तेजस्वी होऊन मोठा शूर होईल.

रतिप्रि०— आपल्या चरणाची कृपा असली तर सर्व होईल.

पुरोहि०— रतिप्रिये, आज तुला कुळरिवाजाप्रमाणें कालिकादेवीच्या
पुजेसाठीं केसरी डोंगरांत जाणें आहे. सर्व तयारी करून मी इ-
कडे आलों आहें.

रतिप्रि०— गुरुजी, ही मी निघालें. (सर्वत्र केसरी डोंगराकडे जा-
तात.)

केसरी डोंगरांतील कालिका देवीचें देवालय.

(भीमराव बैराग्याचे वेशानें प्रवेश करितो.)

भीमराव:— (आपणांत) त्या चांडाळिणीला वचन देऊन मासा
जसा गळीं सांपडतो तसा मी त्या वचनांत गुंतून राहिलों आहें.
असो. आतां धाकट्या बाईसाहेब देवीच्या पुजेस जाणार आ
हेत तर आपण त्या देवालयांत जाऊन बसावें. (असें म्हणून
देवालयांत जाऊन देवतार्चन मांडून बसतो.)

(पुरोहित, रतिप्रिया, मालती व दासी प्रवेश करितात. व-
देवालयाच्या मंडपांत येतात.)

पुरोहि०— रतिप्रिये, बाहेरील देवतांची पूजा आटपली. आतां आंती-
ल देवीची पूजा करण्यासाठीं हें सर्व साहित्य व ही पंचारती घे-
ऊन आंत जा.

(रतिप्रिया पूजासाहित्य घेऊन देवालयांत जाते व देवीची

पूजा करून तिची प्रार्थना करते.)

पद-

(रक्षिं तूं भास्करा या चालीवर.)

त्रिपुर सुंदरी घे मला करीं ॥
मी अनाथ करिं सनाथ पाव लवकरी ॥ ध्रु०॥१॥
अबला मी असें वाडकें तुला गे ॥
रक्षुनी आतां अभय दे मलागे ॥
धांव पाव चरण दाव दुःख दुर करीं गे ॥ त्रिपु०॥२
धांवसी त्वरें भक्तसंकटींगे ॥
दीन रारवणें ब्रीद मिरविसीगे ॥
धरुनि चरण करितें स्मरण मंदमति रवरीगे॥ त्रि०॥

भीमराव.— (पुढें होऊन) हे परमेश्वरा! माझेसाररवा निमकहराम मार्गें झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. अरे! ज्या स्त्रीचे अन्नानें मी आज लहानाचा मोठा झालों त्याच स्त्रीचा मी आपले हातानें घात करणार! (रतिप्रियेकडे पाहून) या स्त्रिचे पोटीं आज सात महिन्याचें बालक आहे! ही स्त्री सुगुणाचें केवळ घर आहे, असें असतां आज मी आपले हस्तानें तिचा घात करणार! असो! परमेश्वरी योगायोग फार कठीण आहे! (रतिप्रियेच्या समोर येऊन उभा राहतो.) हे स्त्रिये, मी तुझा प्राण घेण्यासाठीं येथें आलों आहें. या अंतकाळचे वेळीं तुला शेवटचें परमेश्वराचें स्मरण करणें असेल तर करून घे. (हें ऐकतांच रतिप्रिया मूर्च्छना येऊन भूमीवर पडते व तिची भीमरावास दया येते.)

रतिप्रि.— (मूर्च्छना सांवरून) देवा! आजपर्यंत ज्याविषयीं मी काळजी करीत होतें ती भोगण्याचा हा प्रसंग शेवटीं आणिलास ना! हरहर! परमेश्वरा!

पद.

(किती सांगूं तुला मज चैन नसे या चालीवर.)

काय कर्म गती ॥ प्राक्तनाची असे ॥ ध्रु०॥
पुत्र इच्छा मनीं ॥ मज होती अती ॥

परि देवीं असे ॥ भोगणें ही स्थिती ॥ चाल ॥
मी लेंकरूं, कसा धीर धरूं, कसें करूं ॥ काय० ॥ १ ॥
ही सवत्त नव्हे ॥ काळरूपी सुरी ॥
बाळ वृक्षावरी ॥ घाव घालूं करी ॥
वैर साधीयलें ॥ जन्मजन्मांतरीं ॥ चाल ॥
रक्षीं रक्षीं आतां ॥ दीनानाथा ॥ या अनाथा ॥ काय० ॥ २ ॥

(रतिप्रिया बैराग्यांचे पायां पडते. भीमराव तिला उठवितो.)

रतिप्रि०— हे सत्पुरुषा, मी अनाथ बायको, त्यांत सात महिन्याची गरोदर आहें अशा मला मारून तुला काय बरें मिळणार! जर मला तूं सोडशील तर मी तुला मागशील तें देईन व आम्हां दोघांचे प्राण वांचविल्याचें श्रेय तुला येईल.

भीमराव— (आपणांत) हेंही खरेंच आहे, हिला मारून काय बरें फलप्राप्ति होणार! तर हिचे प्राण वांचविण्याची कांहीं तरी युक्ति काढली पाहिजे. ती अशी कीं, हिचे तर प्राण बांचावे व त्या दुष्ट मदनमंजरीस हिचा घात केल्याची खात्री द्यावी. (थांबून) असें करावें. हिला बैराग्याचा वेश देऊन बरोबर घेऊन जाऊन मोठ्या अरण्यांत नेऊन सोडावी. तेथें परमेश्वर खचित हिचें व हिच्या उदरांतील गर्भाचें संरक्षण करील. माझे मतें हीच युक्ति पसंत आहे. याप्रमाणें करावें. (रतिप्रियेस)

साकी.

चिंता न करीं रतिप्रिये तूं कथितों तुज मी हीत ॥
अतीत वेषा देउनि तुजला नेतों मी विपिनांत ॥
ठेउनि तुज तेथें ॥ येइन परतुनि मी येथें ॥

रतिप्रि०— सत्पुरुषा, कसेंही करून माझे आणि माझे बालकाचे प्राण वांचीव.

(रतिप्रियेस बैराग्याचा वेश देऊन भीमराव अरण्यांत नेतो.)

भीमरा०— हे स्त्रिये, तूं या मोठ्या बिकट अरण्यांत आलीस, आतां तुला येथें सोडून मी स्वनगरास जातों. येथें तूं परमेश्वराचेंच सहाय मागून आपलें संरक्षण करून घे.

रतिप्रि०__ इकडे या अरण्यांतील हिंसक पशूंच्या तडाक्यांतून कसची मी जगतें !

(भीमराव रतिप्रियेस अरण्यांत सोडून जातो.)

प्रवेश २.

(नारायणभट, गोपाळभट, गणेशभट प्रवेश करितात.)

नाराय०__ (रडत) अरेरे! माझें एकुलतें एक बाळ दुष्ट व्याघ्रानें भक्षण केलें। (पुनः रडून) आतां प्रपंचाची माती झाली ! (फार शोक करितो.)

गणेश०__ माझी कन्या गंगा, किती तरी मंजुळ तिचे बोल ! यंदां तिचें लग्न करणार होतों ! शेवटीं त्या दुष्ट व्याघ्राच्या तोंडांत जाऊन पडली ! आतां आपणास तरी वांचून काय दिग्विजय लावावयाचा आहे ! आपणही कोणत्या तरी तऱ्हेनें आत्महत्या करून देह विसर्जन करावा !

नाराय०__ अरे! तुझाच नाश झाला असें नाहीं, माझा तर समूळ नाश ! (रडत) माझी बायको सात महिन्यांची गरोदर ! हिचा सुद्धां दुष्टांनीं ग्रास करून सोडिला ! (रडूं लागतो.)

गोपाळ०__ आतां आपण कितीजरी शोक केला तरी गेलेली गोष्ट कांहीं पुनः येत नाहीं. यासाठीं सर्वत्रांनीं मिळून हें वर्तमान राजास जाऊन सांगावें. प्रजांचें संकट राजानें दूर करावें हें त्याचें कर्तव्य आहे.

नाराय०__ मलाही असेंच वाटतें. एक वार राजाकडे जाऊन हें सर्व वर्तमान राजास कळवून नंतर काय करणें तें करूं. (सर्वत्र विश्वपुरास जातात.)

(शौर्यसागर व विदुषक प्रवेश करितात.)

शौर्य०__ मित्रा, आतांशा कांहीं दिवस प्रत्येक दिवशीं रात्रीं मला दुष्ट स्वप्नें पडतात तेणेंकरून माझे मनाला फारच अस्वस्थता झाली आहे, कोठेंच चैन पडतनाहीं ; कोणतें संकट येणार परमेश्वरास माहित !

विदुषक.__ अरे, स्वप्नें तीं काय! आणि त्याबद्दल तूं खंती करतोस

हें काय ! मला बुवा अशीं रोज शेंकडों स्वप्नें पडतात परंतु मी [illegible]ीं कधींच खिसगणतींत आणीत नाहीं.

(इतक्यांत ब्राम्हण येतात आणि राजाला व्याघ्रउपद्रवाचें-गाऱ्हाणें सांगतात.)

ब्राम्हण:— राजा, व्याघ्रांचा उपद्रव फार होऊन पोराबाळांचा तर समूळ नाश झाला, आतां घरदाराची आशा सोडून तुला गाऱ्हाणें सांगून आपणही आपल्या देहाचा शेवट करून घ्यावा असा संकल्प करून आलों आहों.

शौर्य०— द्विजानों, झाल्या गोष्टीला इलाज नाहीं, परंतु याउपर तुमचे केंसास धक्का न पोंचेल अशी व्यवस्था मी करितों. तुम्ही कांहीं काळजी करूं नये.

ब्राम्हण:— टीक आहे राजा, आतां आम्ही स्वस्थानीं जातों.

शौर्य०— बरें आहे. मीही इकडील व्यवस्था करून लवकरच व्याघ्रनाशासाठीं अरण्यांत जाईन. तुम्ही स्वस्थ असावें.

ब्राम्हण:— उत्तम आहे. राजा, आम्हास या संकटांतून मुक्त केल्यास तुला खचित पुत्रप्राप्ति होईल.

(ब्राम्हण निघून जातात व शौर्यसागर बरोबर शिकारी लोक घेऊन अरण्यांत जातो.)

प्रवेश ४.

अरण्य.

रतिप्रि०— परमेश्वरा ! ज्या वेळेची मी रात्रंदिवस काळजी बाळगीत होतें तो प्रसंग शेवटीं आणिलास ना ! हर हर देवा ! मी अनाथ, निराश्रित या अरण्यांत कायरे करूं !

पद.

(प्रियकर माझे भ्रातेहि मजवर. या चालीवर.)

प्रियकर माझे पतिही मजला शेवटिं अंतरती ॥
बाळक मुख हें पहाणें नाहीं घडलें मज अंतीं ॥ ध्रु० ॥
प्रीति पतीची मजवर असुनी कोठें गेली ती ॥
आशा बहु पुत्राची होती निर्फळ झाली ती ॥ २ ॥
सवत नव्हे ही घातकि सूरी वरवर करि प्रीती ॥

मरण येउंदे मुखें मज परी चित्तीं बाळभीती ॥ ३ ॥

(रतिप्रिया शोकानें मूर्च्छित भूमीवर पडते.)

(शौर्यसागर, प्रधान व सेवक प्रवेश करितात.)

प्रधानः— (कान देऊन) या अशा अरण्यांत हा रुदन ध्वनि कोणाचा बरें ऐकूं येतो. (थांबून) हा ध्वनि स्त्रिचाच असावा. (राजास) सरकार, या बाजूनें कोणी शोक करीत आहे असें वाटतें.

शौर्य०— (कान देऊन) खरेंच कोणी तरी दुःखानें शोक करीत आहे.

प्रधानः— मला वाटतें आपण तिकडे जाऊन कोण कां शोक करीत आहे याचा तपास लावावा.

शौर्य०— होय मलाही असेंच वाटतें. (रतिप्रिया होती त्या ठिकाणीं जातात.) (रतिप्रियेस)

पद-

(पांडु नृपति जनक जया या चालीवर)

कां रडशि स्त्रिये सांग मला ॥ शोक तुला कोणि दिला ॥
मुखिं दिसे गर्भकळा ॥ तेज लोपलें ॥ ध्रु० ॥
माय बाप कोण असे ॥ भर्ता तुझा कोठें वसे ॥
वस्ति ग्राम कोण दिशे ॥ सांग लौकरी ॥ १ ॥
अरण्यांत कां ग येशी ॥ थोर कुळिंची तुं दिसशी ॥
घोर स्थिती कां हि अशी ॥ केश मोकळे ॥ कां० ॥ २ ॥

हे स्त्रिये, तूं शोक कां करतेस तें सांग!

रतिप्रि०— (शौर्यसागराकडे पाहून) महाराज, आपण कोण अहां!

शौर्य०— स्त्रिये, मी विश्वपुरी नगरचा राजा आहें. मला शौर्यसागर असें म्हणतात. व्याघ्राचे नाशार्थ या अरण्यांत आलों होतों.

रतिप्रि०— (राजास नमस्कार करून म्हणते)

पद-

(वस्त्रानें देह सारा सुंदरिनें झांकिला याचालीवर.)

रत्नपुरी नगरि मोठी आहे या भूतळीं ॥

तेथील राजवाची जाया मी तुमचि बाळी ॥
गर्भाचा द्वेषवन्ही सवतीचें हृदय जाळी ॥
शेवटिं या दुःखखाडीं घातलि ही दुर्बळी ॥ रत्न०॥

शौर्य०— तुमच्या सवतीचेंच हें कृत्य असावें असें वाटतें. काय हें साहस! परंतु हें कृत्य तिणें कसें केलें?

रतिप्रि०— माझा घात करण्यासाठीं तिणें मारेकरी घातले.

शौर्य०— मग ते मारेकरी येथें येणार काय?

रतिप्रि०— नाहीं आमचे राज्यापासून एक कोशावर केसरी डोंगरांत आमची देवी आहे तिचे पुजेस मी गेलें होतें.

शौर्य०— मग त्या ठिकाणीं काय घडलें?

रतिप्रि०— कुळाचे रीतीप्रमाणें मी देवालयांत एकटी गेलें.

शौर्य०— आंत पुजेस गेल्यावर मग?

रतिप्रि०— मारेकरी आंत बैराग्याचे वेशानें बसलेला होता. त्यानें हातांत वाघनखें घालून मला मारण्यासाठीं पुढें उभा राहिला.

शौर्य०— काय त्या मारेकऱ्याची छाती!

रतिप्रि०— नंतर मी त्या मारेकऱ्याचें न मारण्याविषयीं पुष्कळ आर्जव केलें व गरोदर असल्याचें सांगून शेवटीं त्यांचे पायां पडलें तेव्हां त्याला दया आली. मग मला त्याणें बैराग्याचा वेश देऊन इकडे आणून सोडलें.

शौर्य०— आतां तूं कांहीं काळजी करूं नको. माझेबरोबर विश्वपुरास चल, मी तुझा मुली प्रमाणें संभाळ करीन.

रतिप्रि०— महाराज, मला माझेबद्दलची कांहींच काळजी वाटत नाहीं; परंतु गर्भाविषयींचीच चिंता फार आहे.

शौर्य०— तूं कोणत्याच प्रकारची काळजी करूं नको.

रतिप्रि०— महाराज, आपणच मला माझे आईबापाचे ठिकाणीं आहां.

(रतिप्रियेस पालखींत घालून सर्वत्र विश्वपुरास जातात.)

(पडदा पडतो.)

अंक दुसरा समाप्त.

अंक ३.

प्रवेश १.

(शौर्यसागर देवतार्चन मांडून देवाची पूजा करीत बसतो.)

पुरोहि०— (प्रवेश करून) राजा, तुझ्या रतिप्रियेस पुत्ररत्न झाल्याचें शुभ वर्तमान तुला सांगण्यास मला मोठाच आनंद वाटतो.

शौर्य०— गुरुजी, खरेंच काय माझ्या रतिप्रियेस पुत्र झाला?

पुरोहि०— हो हो . विचारतोस काय! पुत्र झाल्याची वेळ टिपून ठेवून तसाच लगबगीनें मी इकडे आलों.

शौर्य०— गुरुजी, पुत्र होऊन किती वेळ झाला?

पुरोहि०— बरोबर आठ घटका दिवस झाला होता.

शौर्य०— रतिप्रियेस पुत्र झाला आतां मला कांहीं काळजी राहिली नाहीं. एकदां तो मोठा झाला आणि राज्यकारभार पाहूं लागला म्हणजे मी सुटलों. (पुरोहितास) गुरुजी, रतिप्रियेच्या मुलास पाहण्यासाठीं अंतरगृहांत जाणें आहे यासाठीं आपणाही मजबरोबर येण्याचें करावें.

पुरोहि०— फार उत्तम. (इतकें झाल्यावर राजा व पुरोहित अंतरगृहांत जातात.) (राजास) राजा, पहा मुलाचें मुख प्रतिचंद्रासारखें दिसतें आहे. यासाठीं याचें नांव चंद्रमुख ठेवावें.

शौर्य०— ठीक आहे . मलासुद्धां हेंच नांव पसंत आहे. (नंतर रतिप्रियेच्या पुत्राचें नांव चंद्रमुख मोठ्या समारंभानें ठेवितात.)

पुरोहि०— राजा, मुलाला तर वेळ फार उत्तम लागलेली आहे . सर्व ग्रह चांगले आहेत. हा मोठा योद्धा होईल, सर्वत्र प्रीय होईल, थोर कीर्ति मिळवील, धार्मिक होईल, एकंदरींत याचें जातक फार चांगलें आहे.

शौर्य०— (दुतास) प्रधानजीस रतिप्रियेस पुत्र झाल्याचें वर्तमान कळवून पुत्रोत्साहाचा समारंभ उत्तम प्रकारचा करावयास सांगितला आहे म्हणून सांग.

दूत:— हुकूम सरकार . (प्रधानजीस राजाचा निरोप आऊन सा-

गतो.)

(नंतर चंद्रमुखास पुरोहिताचे स्वाधीन करून शौर्यसागर सर्व विद्या शिकवितो. चंद्रमुख विद्येंत प्रवीण झाल्यावर सर्व राज्यकारभार मुखत्यारीनें पाहूं लागतो.)

प्रवेश २.

चंद्रमुख, प्रधान आणि सेवक प्रवेश करितात.

चंद्रमु०— प्रधानजी, माझे मनांतून उद्यां शिकारीस जाण्याचें आहे, यासाठीं इकडील सर्व व्यवस्था मी पुनः येईपर्यंत तुम्हास सांभाळली पाहिजे.

प्रधान— सरकारची आज्ञा मला शिरसामान्य आहे.

हेर— (प्रवेश करून आपणांत) धाकट्या सरकारानें उत्तर दिशेकडे फिरत राहून कमजास्ती असेल तें वर्तमान आपणास कळविण्याचें काम मला सांगितलें आहे. त्याप्रमाणें मी बहुतेक उत्तर दिशेंतील देश फिरलों. त्यांत बहुतेक स्वस्थता आहे यांत संशय नाहीं; परंतु वसंतारण्यांत दीर्घनेत्र या नांवाचा एक राक्षस उत्पन्न होऊन त्यानें त्या अरण्यांतील तपस्वी जनांस फारच त्रास दिला आहे तर हें वर्तमान राजाच्या कानावर घालणें मला जरूर आहे करितां आपण जाऊन धाकट्या सरकारास भेटावें. (दुतास) धाकट्या सरकारास जाऊन कळीव कीं, उत्तरेकडील बाहुवीर हेर आला आहे.

दूत— सरकार, उत्तर दिशेकडील बाहुवीर हेर आला आहे. हुकूम होईल तर आंत बोलावितों.

चंद्रमु०— त्यास आंत घेऊन ये.

(हेर आंत येतो.)

प्रधान— अरे, उत्तर दिशेकडील देशांत स्वस्थता आहे ना?

हेर— उत्तरेकडील सर्वत्र देशांत स्वस्थता आहे; परंतु वसंतारण्यांत दीर्घनेत्र नांवाचा राक्षस उत्पन्न झाला आहे. तेणेंकरून वनस्थ जनांस फारच त्रास पोंचत आहे. हें वर्तमान सरकारच्या कानावर घालण्याकरतां मी तावडतोब आलों आहें.

चंद्रमु०_ (हेरास) तूं आपल्या कामगिरीवर जा. मी दीर्घनेत्राच्या नाशाची तजवीज करितों. (प्रधानजीस) राक्षसाचे नाशासाठीं मी अरण्यांत जाणार यासाठीं माझ्यामागें राज्यव्यवस्था उत्तम प्रकारें तुम्ही ठेवा; बावास त्रास पोंचूं देऊं नका. (दुतास) सेनापतीस त्वरित बोलाविलें आहे म्हणून सांगून घेऊन ये.

(दूत पडद्यांत जाऊन सेनापतीसह येतो.)

सेनाप०_ (वंदन करून) सरकार, मला फार घाईनें बोलाविण्याचें प्रयोजन काय बरें?

चंद्रमु०_ वसंतारण्यांत दीर्घनेत्र नांवाचा राक्षस फार त्रास देत आहे करितां त्या राक्षसाचे नाशास मी जाणार, तरी तुम्ही मजबरोबर कांहीं निवडक शिकारी फौज घेऊन यावें.

सेनाप०_ सरकार, मी आज्ञेप्रमाणें शिकारी फौज घेऊन येण्यास तयार आहें परंतु आपल्याकडे एक विनंती आहे.

चंद्रमु०_ तुमचें काय म्हणणें आहे?

सेनाप०_ माझें इतकेंच म्हणणें आहे कीं, वसंतारण्यांत जाऊन राक्षसांचा नाश करण्याचें काम मी करितों. आपण येथेंच स्वस्थ बसावें.

चंद्रमु०_ छेः छेः, तें कांहीं होणें नाहीं. मी स्वतः जाऊन त्या दुष्टाचा नाश करणार.

सेनाप०_ ठीक आहे, आज्ञेप्रमाणें सर्व तयारी करतों. (सेनापती निघून जातो.)

विदुष०_ (प्रवेश करून आपणांत) माझा मित्र चंद्रमुख हा राज्यकारभार पाहूं लागल्यापासून त्याची व माझी भेट झालीच नाहीं. (आश्चर्यानें) हीं श्रीमंतांचीं मुलें लहानपणीं आपले मित्रास बरोबरीनें वागवितात; पण एकदां का स्वतंत्र झालीं म्हणजे मग ओळखसुध्दां दाखवित नाहींत. असो. आपल्यास काय कर्तव्य आहे. (थांबून) माझ्या मनांतून एकदां त्याला भेटायाचें आहे. या वेळीं तो कोठें बसला असेल बरें! मला वाटतें तो धाकट्या दिवाणखान्यांत यावे-

ळीं असेल; आपण तेथें जाऊन त्याची गांठ घ्यावी. (चंद्रमुखाकडे येऊन) कसें काय मित्रा, ठीक आहे ना!

चंद्रमु०— मित्रा, चांगल्या वेळीं आलास.

विदुष०— कायरे बाबा, कांहीं फराळबिराळ करावयाचा आहे कीं काय?

चंद्रमु०— तुला आपलें येतांजातां खाण्याचें मनांत वागत असतें. अरे, वसंतारण्यांत दीर्घनेत्र या नांवचा राक्षस तिकडील जनांस उपद्रव करीत आहे, यासाठीं राक्षसांच्या नाशास मी जाणार.

विदु०— तूं आहेस वेडा. अरे, अशा बिकट कामासाठीं आपण स्वतां जाणें उपयोगी नाहीं; कोणास तरी बरोबर फौज देऊन पाठीय म्हणजे झालें.

चंद्रमु०— तसें नाहीं मीच जाणार.

विदु०— बरें बाबा, तूं आतां आमचें कशाला ऐकशील? तूं झालास फार शहाणा.

चंद्र०— तुला काय, आपले सारखेच सगळे मित्रे असें वाटतें.

विदु०— जा बाबा खुशाल जा, पण एकदां सुखरूप ये म्हणजे झालें.

चंद्रमु०— तसें नाहीं. मित्रा, तुलाही मजबरोबर आलें पाहिजे.

विदु०— गड्या, मी आलों असतों परंतु हें राक्षसाचें वर्तमान ऐकल्यापासून माझी बुबा पांचावर धारण बसली आहे.

चंद्र०— मित्रा, अरे पण मी तुझ्याबरोबर आहे ना! मी तुला माझ्याबरोबर रथांत घेऊन जातों म्हणजे झालें ना?

विदु०— हो हो. तूं आपल्या बरोबरीनें मला वागविशील तर मी येण्यास खुषी आहें.

चंद्र०— अरे बरोबर तर काय, तुला गळ्यांतील ताइताप्रमाणें वागवितों.

विदु०— तर मग मी एका पायावर तयार आहें.

(सर्वत्र जातात.)

प्रवेश ३.

चंद्रमुख, सेनापती, विदुषक, सारथी प्रवेश करितात.

चंद्रमु०— (सेनापतीस) दीर्घनेत्र नांवाच्या राक्षसाचा नर नाश झाला, बहुतेक काम तडीस गेलें; आजचा दिवस येथें मुकाम करून उद्यां नगरास जावें.

सेनाप०— मलाही असेंच वाटतें सरकार. कारण आपल्यास फार त्रास झाला आहे.

(इतक्यांत एक हरीण त्यांचे दृष्टीस पडतो.)

चंद्रमु०— (हरिणास पाहून सेनापतीस) पहा या हरिणास पाहिल्यापासून माझी चित्तवृत्ति फिरून गेली आहे. मी या हरिणाच्या पाठीं लागून याचा प्राण हरण करितों; तुम्ही नगरास जावें.

(सर्व सेना नगरास जाते.)

चंद्र०— (सुतास) पहा, हा हरीण कसा थाटानें मागें पुढें पहात आहे तो.

साकी.

हरिण पाहुनी मन हें माझें क्षुब्धचि झालें फार ॥
हरुनि तयाच्या प्राणासी मी शरीर करितों गार ॥
बघ तूं हे नयनीं ॥ चित्त स्वस्थचि रे करुनी ॥

सारथी— खरेंच आहे महाराज, शूरांचें हेंच लक्षण आहे.

चंद्र०— काय या मृगाची चलाखी पहा.

पद.

किति मनोहर पहा हरिण हा पवनापरि पळतो ॥ पहारे ॥
भीत भीन अतिचपल दृष्टिनें चारि दिशा पहातो ॥ ध्रु० ॥ पहा०
बाणभितीनें तनुही आपुली लपवुनि किति धरितो ॥ प०
मार्गा चुकवुनी आड मार्गे हा पळत कसा सुटतो ॥ २ ॥ प०
कांचन कांती दिसे दुरूनी जिव हा किती रमतो ॥ पहा०
देहभान नसे गळुनी गेला मुखिंचा ग्रास हि तो ॥ ३ ॥ प०

सार०— सत्य आहे महाराज. आणखी सरकार,

पद.

(स्मररे स्मर हृदया शंकर भोला या चाली.)

किति हा किति राजा नयनीं दिसतो ॥ सुंदर मृग गमतो ॥
मंदमंद अति चपल दृष्टिनें पवनगतीनें पळतचि सुटतो ॥ धृ०
पहाती तन्मय जिव हा होतो ॥ श्रम दुःखा हरितो ॥
मागें मुख मुरडुनियां पहातो ॥ साचिंतचि बघतो ॥
तनु ही आकुंचित किति करितो ॥ भयभीतचि पळतो ॥
चाल ॥ नादगंध किति मार्गी घेतो ॥ सुगंध सुटतो क-
स्तुरि मृगतो ॥ किति० ॥

चंद्र०— (सारथ्यास) पहा आतां तीर सोडून या मृगाचा प्राण हरण-
करितों.

(पडद्यांत जांगील ऋषीचे शिष्य)

ओंवी.

हो हो सुपात्र नरवरा ॥ आवरीं रे आपुल्या तीरा ॥
आश्रमांतिल हरिणकुमरा ॥ मरणइच्छा न धरीं रे ॥

पद.

(शशिकुळ भूषण गुणवंता या चालीवर.)

महिपाळ वीरा जयवंता ॥ श्रवणीं घे वच बलवंता ॥ धृ० ॥
वज्र कर्दळिवरि जैसें ॥ करुं नको करणें तूं तैसें ॥
नाजुक शरिर हें ऐसें ॥ नेसी विलयातें कैसें ॥
शरिरीं तीर जरी बैसे ॥ घेइल प्राण तयासरिसे ॥ चाल ॥
दुःखि प्रजांचें दुःख हराया जन्म तुझा असतां ॥
खर्ची घालिसि कां तूं वृथा ॥

चंद्र०— महाराज, हा मी माझा तीर काढून घेतला.

ऋषिकुमार— राजा, हें करणें तुझ्या थोरपणाला योग्य आहे.

चंद्र०— महाराज, सज्जनांला आमचेपासून त्रास पोंचूं लागला तर.
आमचें जिणें असून आणि नसून सारखेंच.

ऋषिकुमार— राजा, तूं ह्या अरण्यांत आल्यासारखा आमच्या आ-
श्रमांत येऊन आमचें आदरातिथ्य स्वीकारून मग नगरास जा-
वें हें आमचें तुला सांगणें आहे.

चंद्र०— महाराज, हा आश्रम कोणाचा आहे?

ऋषि०— सद्गुरु जांगील ऋषींचा हा आश्रम आहे.

चंद्र॰_ ऋषि महाराज आश्रमांत आहेत काय?

ऋषि॰_ राजा, गुरु महाराज रुद्रपूरचा राजा विजयसेन याचे बोलवण्यावरून रुद्रपुरास गेले आहेत. आणि घरचें काम कन्या रत्नकांतेकडे सोंपविलें आहे.

चंद्रमु॰_ आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे.

ऋषि॰_ राजा, आमची प्रातःकाळची स्नानसंध्येची वेळ होत चालली ह्याकरितां आम्ही आश्रमास जातों.

चंद्र॰_ महाराज, हा चंद्रमुख आपल्यास नमस्कार करितो हा ग्रहण करावा.

ऋषि॰_ राजा,

साकी.

सर्व विपत्ति पळुनी जाउनि विजयी होशिल तूं रे ॥
सुंदर ललना मिळुनी तुजला पावशि पूर्ण सुखा रे ॥
हरुनी श्रमदुःखा ॥ भोगिशि मनिंच्या सर्व सुखा ॥

(ऋषिकुमार निघून जातात.)

चंद्र॰_ (विदुषकास) काय हा ऋषि आश्रम सुशोभित दिसतो आहे. आश्रम पहातांच मनाला फार आनंद झाला.

शार्दूलविक्रीडित.

मोठे सुंदर रम्य वृक्ष दिसती पक्षी वरी बैसती ॥
त्यांचे मधु शब्द मंजुळ अती कर्णासि ते लागती ॥
छाया ही तरुंची सुशीतळ गमे मार्गश्रमा हारिते ॥
ऐशा ह्या विपिनीं सदैव वसती ते धन्य हें भासतें ॥

विदु॰_ गड्या, मी खरें सांगूं तुला राग नाहीं ना येणार?

चंद्र॰_ मित्रा, तूं कांहीं जरी बोललास तरी त्याचा राग मला मुळींच नाहीं.

विदु॰_ गड्या, या अरण्यांत हीं भटाचीं पोरें रहातात तरी कशीं? याचाच मला मोठा अचंबा वाटतो. अरे; तूं म्हणतोस ह्या अरण्यांत रहाणार प्राणी धन्य आहेत, आणि मला वाटतें त्यांचेसारखे दुर्दैवी प्राणी या जगांत कोणी नसतील. कारण इथें धड खायाला नाहीं, धड वस्त्र नाहीं, एक सांगू कादी

न सांगूं ? बारमाही उन्हाळा, मला एकदां केव्हां घरीं जाऊन ऊनऊनित भात व लोणकडें तूप खाऊन स्वस्थ बसेन असें झालें आहे.

चंद्र०— मित्रा, तुझें तनमन सगळें खाण्याकडे असतें, म्हणून तुला असें वाटतें.

विदु०— अरे मित्रा, (बोटानें) इकडे या बाजूस बारीक बारीक मंजुळ ध्वनि ऐकूं येत आहे.

चंद्र०— गड्या, तूं इकडेच रहा, मी तिकडे जाऊन कोणाचा ध्वनि ऐकूं येतो तें पहातों.

विदु०— बरें आहे. तूं मात्र जलदीनें येहो.

रत्नकांता, (जांगील ऋषीची कन्या) मंजुळा, वसंतसुंदरी, मधुमोगरी (रत्नकांतेच्या सख्या) बागांतील झाडांस पाणी घालितात.

चंद्र०— (इकडे तिकडे पाहून) हा ध्वनि इकडून येतो तर आपणाही या रस्त्यानें हळूहळू जावें. (ऋषिकन्यांकडे पाहून) - या ऋषिकन्या झाडांस पाणी घालीत आहेत. मी जर यांचे दृष्टीस पडलों तर ह्या एकदम बिचकतील यासाठीं आपण त्यांस दृष्टीस पडणार नाहीं अशा ठिकाणीं रहावें. (झाडा आड रहातो.)

मंजुळा:— सखे रत्नकांते, अग असें आळसानें पाणी कां घालतेस? नीट घाल.

रत्न०— मी कांहीं बाई आळसानें पाणी घालीत नाहीं. तूं सगळ्या आपल्याच सारख्या आळसानें कामें करितात असें समजतेस.

वसंत०— अग मंजुळे, रत्नकांतेचें चित्त आतांशा जाग्यावरती नाहीं. ती आतांशा उगेंच बाबांच्या डोळ्यांस पाणी लावण्यासाठीं इकडे येते.

मधुमो०— गडे मंजुळे, मलासुद्धां आतांशा रत्नकांतेचें मन चलबिचल झाल्याचें दिसतें. पण असें होण्याचें कारण काय बरें असावें?

मंजु०— खरें बाई, मला वाटतें बाबांनीं परवां रुद्रपूरच्या राजाच्या मुलीचे लग्नाच्या समारंभाचें वर्णन केलें त्यांत त्या नगरच्या बायकोंचा झालेला विनोद वर्णन केला तेव्हांपासून हिचें मन थाऱ्यावर नाहीं.

वसंत०— खरेंच गडे, त्या वेळीं बाबासही पुनःपुनः त्या गोष्टी सांगण्यास आग्रह करीत होती. व त्या गोष्टी ती मनापासून ऐकत होती.

रत्न०— (रागीट मुद्रेनें) हे सगळे विचार तुमचे मनांत घोळतात यामुळें तुम्हांस असें वाटतें.

चंद्र०— खरेंच आहे. ही ऋषिकन्या नवयौवनाच्या भरांत असल्यामुळें हिला अशा प्रकारच्या गोष्टी कां बरें रुचणार नाहींत!

मंजुळा:— वसंतसुंदरे, ज्या दिवशीं बाबांनीं रुद्रपूरचे राजाचे मुलीचे लग्नाची गोष्ट सांगितली त्या वेळीं रत्नकांतेच्या लग्नाविषयीं बाबा बोलत होते त्यासमयीं तूं होतीस ना?

वसंत०— मी प्रथमतः होतें परंतु नंतर कांहीं कारणासाठीं मीं गेलें. त्यानंतरची हकीगत मला माहित नाहीं.

मधुमो०— अग, मीं शेवटपर्यंत तिथें होतें.

वसंत०— बाबा हिच्या लग्नाविषयीं काय म्हणत होते?

मंजुळा:— हिलाही एका सुंदर व कुलीन अशा राजपुत्राला द्यावयाची असें बाबा म्हणत होते.

चंद्र०— काय! हिला राजपुत्राला द्यायाची म्हणतात! (आश्चर्यानें) हिला कोणत्या राजपुत्राला देणार म्हणतात बरें! ज्या राजपुत्राला ही अलभ्य वस्तु प्राप्त होईल तो मोठा भाग्याचा असावा.

भैरवी.

(बाबा गेली शकुंतला॥ आपुल्या पतिसदनाला या चा०)

भाग्या पार नसे त्याच्या॥ तोची एक दैवाचा॥ धृ०॥
रुळती सुंदर केश हे आंगीं॥ घेतां चुंबन बहुत सुरंगीं॥
नाजुक तनु बहू जी गोरांगी॥ भोगही गालाचा॥ भा०॥१

बघतां तनु मज मोहचि पडतो ॥ कटिभाग बहु सुंदर दिसतो ॥
पहातां केसरी लज्जित होतो ॥ गर्व गळे त्याचा ॥ भाग्या० ॥२
सुवर्णकांती दिसे देहाची ॥ मृगनयनाही चंचल मनिंची ॥
स्तन हे भासती मज चेंडूची ॥ लपवी भय चोराचा ॥ भाग्या० ॥३

मंजुळा:— खरेंच गडे, म्हणूनच या रत्नकांतेचें चित्त हल्लीं थाऱ्यावर नाहीं.

रत्न०— (चकित होऊन) सखे मंजुळे, हा पक्षी पाहिलास काय? मी तर बाई असा पक्षी कधींही पाहिला नाहीं. याचे पंखांना चकचकाट पाहून माझे तर बाई डोळेच दिपून गेले.

मंजुळा:— खरेंच गडे, मींसुद्धा असा पक्षी कधींही पाहिला नाहीं. काय बरें या पक्षास म्हणतात?

रत्न०— मला कांहीं माहित नाहीं.

वसंत०— मला वाटतें हा राजहंस असावा.

रत्न०— सख्यांनों, तुम्ही इकडेसच रहा; मी हळुहळु जाऊन त्या पक्ष्यास धरितें. (हंसास धरण्यास जाते व हंस उडून जातो. असें पाहून सख्यांस) गडबानों, हा हंस कांहीं माझे हातीं सांपडत नाहीं, आणि माझें मन तर याचे वर फारच बसलें आहे.

चंद्र०— ही आपलें मन या हंसावर बसलें आहे म्हणते. हे हंसा,

साकी.

भाग्यवंत एक तूंची हंसा इतर अभागी सारे ॥
जें मन मिळणें दुर्लभ मजला तें तूं मिळविशि बारे ॥
हस्तीं तुज घ्याया ॥ इच्छा करिते ऋषितनया ॥

विदु०— (प्रवेश करून आपणांत) चंद्रमुखास जाऊन बराच वेळ झाला, अजून तो कां बरें आला नाहीं? (थांबून) आम्हांस विश्वपुराहून येते वेळीं वेळ तरी कोणती लागली होती परमेश्वरास ठाऊक. असो. आतां आपण तो गेला त्याच वाटेनें जाऊन त्याचा तपास लावावा आणि एकदां तो मला भेटला म्हणजे त्यास घेऊन लागलेंच नगरास जावें. (चंद्रमुखाला दुरून पाहून) हे राजश्री एकसारखे टक लावून त्या ऋषींच्या पोरींकडे पहात आहेत तेव्हां हें कां मला घड चिन्ह दिसत नाहीं. (चंद्रमुखाजवळ जाऊ-

न त्यास) मित्रा, शाबास ! अरे, मला तिकडे खडकावर बस-
वून तूं इकडे गमजा मारीत रहातोस ना!

चंद्र०— गडबा, या ऋषीकन्यांपैकीं जी त्या हंसाच्या मागें लागली आ-
हे त्या स्त्रीवांचून दुसरें मला कांहीं दिसत नाहीं व भासत नाहीं.

विदु०— (कपाळावर हात मारून) नशीब माझें त्यास दुसऱ्याकडे का-
य बोल ! ज्यापेक्षां हा या स्त्रीचे नादीं लागला त्या पेक्षां मला
वाटतें हा कांहीं लवकर नगरास जात नाहीं. कुठली झक मार-
ली आणि याचे बरोबर आलों असें मला झालें आहे. मला का-
य माहित होतें हें पुढें असें अरिष्ट उद्भवणार म्हणून! असो.
आतां आलेला प्रसंग युक्तीनें मारून नेला पाहिजे. यासाठीं या-
स काहीं तरी सुविचार सांगून याचें मन या स्त्रीवरचें उडवि-
ण्याची युक्ति काढली पाहिजे. (चंद्रमुखास) मित्रा, तूं का-
य वेडा आहेस! अरे, हिच्या लावोपट सुंदर स्त्रिया मोठमो-
ठ्या राजांच्या तुला वरण्याची इच्छा धरून परमेश्वरापाशीं -
तूंच वर मागत आहेत. किती एक सुंदर राजकन्यांचे पुतळे घे-
ऊन शेंकडों वकील तुला देण्याचे आशेनें थोरल्या सरकाराशीं-
बोलणें लावीत आहेत; आणि तूं या भटाच्या भिक्षुकाची पो-
री वरण्याची इच्छा करितोस तेव्हां तुला काय म्हणावें ! अरे,
ही पोरगी अरण्यांत जनावरासारखी निरंतर रहाणारी, हिला
धड वस्त्र धरणेंसुद्धां ठाऊक नसेल; आणि अशा स्त्रीवर मन
बसलें म्हणून सांगतोस याचाच आधीं मला मोठा अचंबा वा-
टतो. मला कांहीं गोष्ट पसंत वाटत नाहीं. याकरितां तूं माझें
ऐक आणि सत्वर नगरास या भिकारड्या पोरीचा नाद सोडून
चल. नगरास गेलास म्हणजे थोरल्या सरकारास सांगून तु-
झें एका फक्कड राजकन्येशीं लग्न लावून देववितों. सोड हा ना-
द.

चंद्र०— ठीक ठीक. हे राजश्री बाबांस सांगून माझें लग्न करणार!
मित्रा, तुला केव्हां एकदां नगरास जाईन असें झालें आहे प-
रंतु नगरास जाऊन काय करावयाचें आहे. (आपणांत).
यास माझें मन ऋषिकन्येवर आहे आहे असें खास समजलें.

यासाठीं याची समजूत उलट केली पाहिजे, नाहीं तर हा जाऊन सगळ्या राजवाड्यांत हेंच सांगत सुटेल. (विदुषकास) मित्रा, मी माझें मन या स्त्रीवर आहे असें तुला थट्टेनें सांगितलें. तूं पहा आम्ही कोठें आणि हीं भटाचीं पोरें कोठें !

विदु०—(आनंदानें) ईश्वर करो व तुझी हीच बुद्धि कायम राहो आणि एकदां तुला लवकर घरीं जाण्याची मति देवो. मित्रा, मी या उन्हाच्या व इकडून तिकडे व तिकडून इकडे याप्रमाणें फिरण्याच्या त्रासानें फार दमून गेलों आहें यासाठीं चल बघूं लवकर आश्रमाकडे जाऊं.

चंद्र०—मित्रा, मला ऋषीकडून आमंत्रण आलें आहे यासाठीं मी ऋषिआश्रमाकडे जाऊन येतों. मी येई तोंपर्यंत तूं आपल्या आश्रमास जा.

विदु०—(आपणांत) मला वाटतें ही सर्व याची सबब आहे. ह्याचे मनांत ह्या ऋषिकन्येची गांठ घेण्याची आहे यामुळेंच हा उडवाउडव करून दूर टाकतो; नाहीं तर हा माझ्यावांचून एक क्षणसुद्धां रहात नसे. आतां आणखी जर मी याचे आड येईन तर हा तिसरेंच कांहीं तरी लिचांड काढून मला कुठल्या कुठें कामगिरींत पाठवील यासाठीं गपचीप आश्रमास जावें हें बरें. (चंद्रमुखास) गड्या, मी तुझ्या सांगण्याप्रमाणें आश्रमास जातों पण तूं मात्र जलदी येहो.

चंद्र०—पहा तरी, मी तुझे मागोमाग आलोंच असें समज.

विदु०—ठीक आहे, मी सर्व समजलों. (निघून जातो)

चंद्र०— (झाडा आड उभें राहून ऋषिकन्येचीं भाषणें ऐकतो.)

रत्न०—सखे मंजुळे, हा हंस कांहीं माझे हातीं लागत नाहीं. हा मिळण्यास काय उपाय करावा बरें !

मंजुळा—गडे, या भूमीचा प्रतिपालक चंद्रमुख महाराज या अरण्यांत आला आहे असें मी काल बाबांच्या तोंडानें ऐकलें तो जर या समयीं इकडे असता तर खचित हा हंस तुला धरून देऊन तुझे सर्व हेतु पूर्ण करता.

रत्न०—(रागीट मुद्रेनें) चल गडे, तुला आपलें जर कोणी नदींत बुडून मरत आहे तर तूं म्हणणार बुडत आहे तें बरें.

चंद्र०— (आपणांत) या सुंदरीच्या सखीनें तुझे सर्व हेतु पूर्ण करता अ-सें स्वोचित भाषण केलें यामुळें ही रागावली· परंतु या बोलण्यां-त तिचा मतलब काय बरें असावा! (थांबून) हां समजलों· त-रुण बायकांचे हेतु पूर्ण करण्यास मी योग्य आहें असें तिनें म्ह-टलें· जर असाच तिच्या बोलण्याचा भावार्थ असला तर ती अग-दीं बरोबर बोलली. कारण या स्त्रियेच्या उपभोगास पात्र असा मी आहें असें जाणूनच ती बोलली यांत कांहीं संशय नाहीं· (पु-नः थांबून) अरे, या स्त्रीच्या सौंदर्यास लंपट होऊन वेडा तर झा-लों नाहीं ना! कारण माझे मनांत जे विकार येताहेत त्याप्रमा-णेंच मी हें भाषण करितों· असो· या स्त्रिया पुढें काय भाषण करितात तें ऐकावें· (कांहीं पुढें सरून ऐकतो·)

वसंत०— सखे मंजुळे, तो चंद्रमुख राजा या वनांत कशासाठीं आला-आहे?

मंजु०— अग तो या अरण्यांत दीर्घनेत्र राक्षसाचा त्रास पोंचत होता हें तुला माहित आहे ना!

वसंत०— होय तें मला माहित आहे.

मंजु०— त्या दीर्घनेत्राचा नाश करण्यासाठीं या अरण्यांत आला होता· त्याचा नाश केल्यावर एक हरीण त्याचे दृष्टीस पडल्यावरून-तो त्या हरिणाच्या पाठीस लागून इकडे आला, असें काल का-का म्हणत होते·

मधु०— सखे मंजुळे, परवां तातांनीं ज्या वेळीं रुद्रपूर येथील राजक-न्येच्या लग्नाच्या गोष्टी सांगितल्या त्यावेळीं तातांनीं ज्या रा-जपुत्राच्या गुणांचें व स्वरुपाचें वर्णन केलें तोच हा चंद्रमुख का-य?

मंजु०— अग होय, तोच हा· तो जर या वेळीं इकडे आला असता तर हा हंस धरून या आमच्या सखीचे अंतर हेतु व बाह्य हेतु पूर्ण करता·

चंद्र०— आतां तर माझी पुरी खात्री झाली· मी जो पूर्वी मनांत विचार केला होता व माझ्या मनांत जो हेतु घोळत आहे त्यासारखेंच यांचें बोलणें दिसतें· (आश्चर्यानें) परंतु या सुंदरीला अशा सं-

भाषणापासून आनंद व्हावा तो न होतां उलटें वाईट वाटतें हें कसें! समजलों! यांच्या समक्ष जर तिणें या गोष्टी ऐकून आनंद झाल्याचें आपल्या सख्यांला दर्शविलें तर त्या हंसून दूषण देतील; म्हणूनच तिणें वाईट वाटल्याचें दाखविलें.

मंजुळा:— सखे रत्नकांते, पहा आतां वेळ झाला यासाठीं या हंसाला धरण्याचा नाद सोडून लवकर घरीं जाऊं.

रत्न०— गडे, हा हंस धरण्याची मला तर फारच उत्कंठा लागून गेलेली आहे व माझ्यानें ह्याला सोडून जाववत नाहीं.

मंजु०— सखे, हा हंस आपणासारख्या स्त्रियांला कधींच सांपडणार नाहीं; यासाठीं तो राजपुत्र जर इकडे येईल तर फार बरें होईल.

चंद्र०— आतां आपणास पुढें जाण्यास हीच संधी योग्य आहे. परंतु मी हें बोलणें ऐकून इकडे आलों असा त्यांना भास न होई अशा युक्तीनें गेलें पाहिजे; तर काय सबबीनें जावें बरें? (आठवलें सें करून) आणखी कोणत्या सबबीनें जायाचें! आपल्यास तहान लागल्याचें मिष करून पाणी शोधण्याचे इराद्यानें जावें, म्हणजे झालें. (मोठ्यानें) माझा तहानेनें प्राण फार व्याकुळ झाला आहे याठिकाणीं जर कोठें पाणी मिळेल तर उत्तम होईल.

मंजु०— सखे रत्नकांते, (हातानें) या ठिकाणीं कोणी पाण्यासाठीं फिरत आहे तर कोण पाणी शोधीत आहे तें पाहून ये.

रत्न०— (चंद्रमुखास पाहून परत येते.) (मंजुळेस) सखे, कोणी राजपुत्र तहानेनें व्याकुळ होऊन पाणी पाणी म्हणत फिरत आहे. यासाठीं तूं जाऊन त्याला इकडे घेऊन ये, म्हणजे त्यांना उदक देऊन तृप्त करूं.

चंद्र०— (ऋषिकन्येकडे येऊन) हे स्त्रियांनों, मी तहानेनें फार व्याकुळ झालों आहें या वेळीं जर मला उदक आणून द्याल तर माझ्यावर मोठे उपकार होतील.

मंजु०— (आसन देऊन) महाराज, या आसनावर आपण बसावें. आपल्यासारख्यांस जर आमच्याकडून पाणीसुद्धां मिळणार नाहीं तर आमचें जीणें असून उपयोग तरी काय? (रत्नकांतेकडून उदक आणवून देते.)

मधु०__ महाराज, आपल्या दर्शनानें आम्ही पुनीत झालों व आपले चरण आमचे आश्रमास लागल्यापासून आमचा आश्रम पवित्र झाला.

वसंत०__ सखे रत्नकांते, आश्रमांत जाऊन अतिथींची पूजा करण्यासाठीं पुजेचें सर्व साहित्य घेऊन ये. मी इकडील सर्व तयारी ठेवितें.

(चंद्रमुख रत्नकांतेच्या मुखास पाहून मोहित झाल्याचा भाव दाखवितो.)

रत्न०__ (मनांत) मला तर या अतिथी महाराजांस पाहिल्यापासून डोळ्यांचें पातें लवतें तितका वेळ फुकट जातो असें वाटतें; आणि ही तर मलाच पुजेचें साहित्य आणण्यास सांगते. माझ्यानें तर ह्या अतिथी महाराजांवरची नजर सुद्धां काढवत नाहीं तर यास काय करावें बरें! (विचार करून) मीच इकडची सर्व तयारी ठेवितें, तूंच जाऊन पुजेचें सामान घेऊन येईनास का!

चंद्र०__ हे स्त्रियांनो, मीं तुमच्या ह्या प्रीतिपुरःसर आदरसत्कारानेंच संतुष्ट झालों. शिवाय माझी पूजा करण्याचें कांहीं कारण नाहीं.

मधु०__ सखे वसंतसुंदरे, पहा पहा आमच्या या प्रियसखीचे नेत्र या अतिथींच्या मुखचंद्राकडे कसे गुंतून गेले आहेत ते!

वसंत०__ खरेंच गडे, हिणें या अतिथींची मानस पूजा करून त्यांचें चित्त हरण केलें आहे असें मला वाटतें.

रत्न०__ मनीं वसे तें स्वप्नीं दिसे याप्रमाणेंच हें तुमचें म्हणणें आहे, तुम्ही पाहिजे तें म्हणा. (सलज्ज होऊन एकीकडे उभी रहाते व मनांत) या पुरुषाला पाहिल्यापासून माझ्या मनाचा असा भलताच प्रकार कां बरें होत आहे.

मधु०__ सखे वसंतसुंदरे, पहा रत्नकांता खालीं मान करून आपल्या मृगनेत्रांसारख्या नेत्रांनीं अतिथींकडे एकसारखी टक लावून पहात आहे ती.

वसंत०__ खरेंच गडे. (कानांत) पण सखे, हा अतिथी कोण व-

रें असावा? याचे मुखचंद्राकडे पाहिलें असतां मला असा भास होतो कीं, प्रत्यक्ष मदनच आहे कीं काय? याणें हातांत तिरकमठा धरला असल्यामुळें असें वाटतें कीं साक्षात् रामचंद्रजी-सीतेचा शोध लावण्यासाठीं फिरत फिरत या अरण्यांत आले-कीं काय! अशा प्रकारचें या सत्पुरुषाचें अप्रतिम लावण्याचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच, असा हा पुरुष कोण बरें असावा!

मंजु०__ सख्यानों, मी काल थोडीशी अशी गुणगुण ऐकिली होती कीं, या आमच्या आश्रमांतील भूमीचा पालक जो विश्वपुरी नगराचा राजा शौर्यसागर त्याचा पुत्र चंद्रमुख हा दीर्घनेत्र राक्षसाच्या नांशार्थ या रानांत आला होता· त्या राक्षसाचा नाश करून फिरून नगरास जात असतां एका हरिणाचे मागें लागून-आपले आश्रमाजवळ आला आहे तोच हा असावा असें मला वाटतें·

वसंत०__ (मंजुळेच्या हातावर हात मारून) तोच जर असला तर फारच बरें होईल·

मधु०__ कां बरें, तो असला तर काय झालें असतें!

वसंत०__ हें बघ· जर खचित तो चंद्रमुख असला तर बाबांस रत्नकळेसाठीं भ्रतार शोधण्याचे श्रम पडणार नाहींत·

चंद्र०__ ही योग्य तेंच बोलली·

रत्न०__ चला बाई, तुम्ही पाहिजे तें म्हणा, मला काय तुमच्या तोंडाला हात धरितां येतो! मी आपली कशी निघून जातें· (असें म्हणून जाऊं लागते·)

मंजु०__ सखे, तूं जाण्यास कांहीं स्वतंत्र नाहींस· विचार कर, मामांनीं आज सहस्त्र दुर्वा आणण्याचें काम तुजकडे संपविलें आहे·

चंद्र०__ ही काय म्हणते हिला सहस्त्र दुर्वा आणण्याचें काम सांगितलें आहे! ह्या ऋषीच्या कठोर हृदयाचें मला मोठें आश्चर्य वाटतें·

पद·